कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना
१९९१


कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क



''मेरी झाँसी नहीं दूँगी''

• पुणे • वर्ष १४ वे • अंक ४ था • जानेवारी-मार्च २०१९ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-



Pitambari

SOLARCARE

Let Sun do the work!

# Go Green with Free Energy

## Why Pitambari Solar Care?




On-Grid System/ Grid Tied System

Pitambari Solar Care Division's emphasis on Quality & Excellence has allowed us to offer Customized Solutions to customers ensuring savings in electricity bills & higher return on investment.

### Key components of our unique:

#### Project Management




- Data Collection & Analysis
- System Analysis
- Feasibility Study
- Shadow Analysis
- Design & Engineering
- Implementation Plan
- Continual Evaluation

#### Experienced Team



- Design & Engineering
- Project Management
- Quality Control
- Govt. Liaisoning

Mr. Shamindra Kulkarni: 9619850335, Mr. Chaitanya Palsule: 9870403928

**Pitambari Products Pvt.Ltd.**

Thane: 022-6703 5555, CIN: U24239MH1989PTC051314. solar@pitambari.com | www.pitambari.com/solarcare

| शहर : | सभासदाचे नाव<br>व क्र.: | वर्गणी कालावधी |
|---|---|---|


कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

वर्ष १४ वे | जानेवारी-मार्च २०१९ | अंक ४ था



अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१



संस्था नोंदणी क्र. महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६



## संपादक मंडळ

**प्रभारी संपादक** : श्री. गोपाळ भाटवडेकर, ९८५०९७९७०६

**तंत्रज्ञ** : श्री. सचिन ताटके, ९८६७१ ९२३१०

**सल्लागार** : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली-सदस्य
९८३३१ ६३६५९

**सदस्य** : श्रीधर पंतवैद्य, ७७०९० ०८३६९

**प्रकाशक** : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९ ०७७८९


### शहर प्रतिनिधी-

- श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१ ५५२१५
- श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
- श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
- श्री. मनीष नवाथे, नागपूर ९८५०३ ३१४६० *
- सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
- श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११० ६३०३०
- श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५ ४९०८५
- श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
- श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
- श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९४२८२३३१८८
- श्री. श्रीधर पंतवैद्य, पुणे, ७७०९० ०८३६९
- श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
- श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७
- श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
- श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०
- सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५


| जाहिरातीचे दर | | |
|---|---|---|
| पान | एक वेळ | चार वेळा |
| पाव | रु. ५००/- | रु. २०००/- |
| अर्धा | रु. १०००/- | रु. ४०००/- |
| पूर्ण | रु. २०००/- | रु. ८०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३०००/- | रु. १२०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | - |



**नियतकालिकाचे नाव** : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता** : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा** : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
**संपादक** :श्री. गोपाळ भाटवडेकर
**मुद्रक** : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.



**ऑफिस संपर्क** : ०२०-२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. 300/-, रु. 500/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-30 च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे). शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 055210110004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयातच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

# अनुक्रमणिका

संपर्क

संपादक मंडळ

हेमंत पुराणिक
संपादक
मो. ९९२३८ १०१९४

गोपाळ भाटवडेकर
उपसंपादक
मो. ९८५०९ ७९७०६३

गणेश गुर्जर
प्रकाशक
मो. ९८९०९९०११३

सचिन ताटके
तंत्रज्ञ सदस्य
मो. ९८६७१ ९२३१०

सौ. मेघना नाटेकर
सदस्य
मो. ७३५०७ ८८८२५

ऋषिकेश पळसुले
सदस्य
मो. ९४०३७ ०२७३४

प्रदीप हळबे
सल्लागार
मो. ९८३३१ ६३६५९

अविनाश मणेरीकर
सदस्य
मो. ९४२२३ ७९८७८

- संपादकीय ३
- एका विशाल कुटुंबाची सहलगाथा - सौ. अंजली विजय आंबर्डेकर ४
- संघावरील विश्वास आणि दातृत्व यांचा अनोखा संगम.... ७५ लाखांचे दान - गणेश गुर्जर ६
- आयुष्याचे धागेदोरे... - श्री. वसंत प्रभुदेसाई ७
- खमंग काटदरे - श्री. बाळसाहेब भाटे ८
- तरुणाई - श्री. राजेंद्र करंबेळकर १०
- कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क' त्रैमासिक नव-निर्वाचित संपादक मंडळ ११
- खडूचे अभंग - डॉ. श्रीकृष्ण जोशी १२
- इद्यापीठ - श्री. दीपक पेंढारकर १३
- पुण्यातील पेठांची यादी व माहिति (इतिहास) - श्री. प्रमोद तांबे १४
- मिल्क कुकर व राईस कुकर - कुमार माईणकर १७
- उरका-उरकी न करण्यासारख्या दोन गोष्टी : १. स्नान २. जेवण - श्री. श्रीहरी गुणे १८
- संस्थावृत्त-
  - रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ १९
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत २१
  - राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ, सोलापूर अहवाल दि. ८.१२.२०१८ २१
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे शारदीय संमेलन २२
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली २३
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नागपूर २४
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर २४
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ , मुंबई यांचा श्रावणसंध्या २६
  - कशेळी येथील राणी लक्ष्मीबाई जयंतीचा वृत्तांत २६
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ , पुणे २७
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ २७
- मा. दीनानाथ मंगेशकर - श्री. उदय सप्रे २८
- कविता - चांदण्याचे थवे - सौ. शुभदा गुर्जर २९
- बाळशास्त्री जांभेकर - श्री. संदीप कळके ३०
- राम-कृष्ण लीला - सौ. वीणा प्रदीप नाटेकर ३२
- मूली खाने से होने वाले फायदे - श्री. श्रीकृष्ण आंबेकर ३५

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# संपादकीय

नमस्कार,

पुणे संघाकडे महासंघ व संपर्कचे काम येऊन आता सात वर्षे पूर्ण झाली आहेत आणि या काळात महासंघाच्या या मासिकामध्ये आमूलाग्र बदल करण्यात आले आणि आपण सर्वांनी ते स्वीकारून त्याचे स्वागतही केलेत, त्याबद्दल संपर्कच्या वतीने आपल्याप्रति कृतज्ञता व्यक्त करत आहोत.

गेल्या १९ ऑगस्ट २०१८ मध्ये महासंघाच्या सभेमध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये संपर्कसाठी संपादक मंडळ नियुक्त करण्यात आले. 'संपर्कच' मासिकामध्ये आपल्या ज्ञातीमधील लेखक, कवी. यांना तसेच काही नवोदित लेखक, कवी यांनाही संपर्काच्या माध्यमातून एक व्यासपीठ निर्माण करून द्यावे, हा यामागील हेतू आहे आणि यापूर्वीही होताच. संपादक मंडळाचा कायम प्रयत्न राहील की, आपल्या ज्ञातीमधील सभासदांकडून जे-जे साहित्य येईल, त्याची तपासणी करून त्या साहित्यास 'संपर्क' मध्ये प्रसिद्धी देण्यात येईल.

'संपर्क' हा आपल्या ज्ञातिबांधावांकडे जास्तीत जास्त पोहोचला जावा, या हेतूने महासंघाच्या सर्व संघ-सदस्यांना विनंती करून आपण प्रत्येक शहराकरिता एक प्रतिनिधीची नियुक्ती केली आहे आणि त्याची तसेच संपादक मंडळाची यादी या जानेवारी-मार्च अंकामध्ये छापली आहे. आमच्याकडून आम्ही 'संपर्क'चे सभासदवृद्धीसाठी प्रयत्नशील आहोतच, पण संपर्काच्या साभासादांनीसुद्धा याचा प्रचार प्रसार करणे आवश्यक आहे. सन २०१२ पासून 'संपर्क'चे बरेच सभासद फक्त एक वर्षाची वर्गणी भरून सभासदत्व घेतात, पण नंतर पुढील वर्षाची वर्गणी अनवधानाने भरली न गेल्यामुळे त्यांना अंक मिळत नाहीत. महासंघाने पूर्वीची प्रथा सुरू ठेवून वर्गणी संपल्यानंतर आठवणीसाठी म्हणून पुढील एक अंक अशा सभासदांना पाठवला जातो, पण वर्गणी जमा न केल्यामुळे नंतर ते सभासद पुढील अंकास मुकतात. शहर प्रतिनिधींना आपण सप्टेंबर २०१८ अखेरची सर्व सभासदांची यादी पाठवणार असून, ज्या सभासदांनी वर्गणी जमा केली नाही त्यांना स्मरणपत्र पाठवली जाणार आहेत. यामागील उद्देश हाच आहे की, 'संपर्क'च्या माध्यमातून आपण सगळे कऱ्हाडे जोडले जाऊन आपल्या ज्ञातीसाठी काही भरीव कार्य करण्यासाठी एकत्र येऊ.

**या ठिकाणी असेही नमूद करावेसे वाटते की, महासंघाकडे शैक्षणिक व वैद्यकीय मदतीची योजना आहे आणि त्याबाबतची माहिती आपली शहरातील संघाकडे उपलब्ध आहे. तरी यासाठी सर्व संघ प्रतिनिधींनी योग्य ते सहकार्य करून या निधीचा लाभ गरजू आणि योग्य अशा व्यक्तींना मिळेल, असे प्रयत्न करावेत, अशी आग्रहाची विनंती आहे.**

मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित सर्व सभासद, जाहिरातदार, सर्व संघ आणि त्यांचे प्रतिनिधी यांना हार्दिक शुभेच्छा!!

पुणे, दि. २६/१/२०१९

संपादकमंडळ

# एका विशाल कुटुंबाची सहलगाथा

शब्दांकन :
सौ. अंजली विजय आंबर्डेकर, गिरगाव
मो. : ९८१९६ ७३९६८

दि. २४ ऑक्टोबर २०१८ रात्री ते २८ ऑक्टोबर २०१८ रात्रीपर्यंत अशी चार दिवसांची देवदर्शन यात्रा ठाण्याच्या श्री आर्यादुर्गा ट्रॅव्हल्सने आयोजित केली होती.

या यात्रेत श्री महालक्ष्मी मंदिर- कोल्हापूर, श्री नृसिंह सरस्वती मंदिर- नरसोबावाडी, श्री क्षेत्र गणपतीपुळे गणपती मंदिर, श्री लक्ष्मीपल्लीनाथ मंदिर पाली- रत्नागिरी, श्री आर्यादुर्गा मंदिर हंसोळ राजापूर, श्री देव धोपेश्वर- राजापूर, श्री देव कनकादित्य सूर्य मंदिर- कशेळी, स्वामी स्वरूपानंद समाधी मंदिर- पावस अशा देवस्थानांचा समावेश होता.

श्री आर्यादुर्गा ट्रॅव्हल्सचे संचालक श्री. संदीप कळके यांना प्रवासाची अतिशय आवड, पण सहलीच्या आयोजनाचा कोणताही अनुभव त्यांच्या गाठीशी नव्हता. असे असूनही यात्रेकरू जमा करून, यात्रेकरिता वातानुकूलित बसचे आयोजन, सर्व ठिकाणची न्याहारी, भोजन, निवास- व्यवस्था या सर्व गोष्टींची सुसूत्रपणे आखणी करून अत्यल्प खर्चात 'ना नफा-ना तोटा' या तत्त्वावर संदीपजींनी ही यात्रासहल यशस्वी केली आणि ही सर्व व्यवस्था त्यांनी एकट्याने केली होती, हे विशेष !

ठाण्याहून निघून सर्व देवस्थानी दर्शन करून परत ठाणे हा प्रवास वातानुकूलित लक्झरी बसने सुकरपणे घडवला. बसमधील ६०% प्रवासी हे ज्येष्ठ नागरिक होते, तर उर्वरित प्रवासी हे ४० ते ६० या वयोगटातील होते आणि दोन छोट्या मुली (५ व ७ वर्षे वयाच्या) होत्या.

गुरुवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०१८ या पहिल्या दिवशी आम्ही कोल्हापूर येथे सकाळी ६.०० वाजता पोहोचलो. निवास व्यवस्थेनंतर स्नानादी आन्हिके उरकून त्यांनी सकाळी १०.०० वाजता श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे नेले. ठीक १२.०० वाजता सगळ्यांना श्री नृसिंह सरस्वतींच्या पादुकांचे दर्शन मिळाले. वाडीचे



श्री. सचिन सोमण यांच्या भोजनालयात (प्रेमळ आग्रहाचा) बासुंदीसह सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. परतीला जयसिंगपूर येथील गणपती मंदिरात दर्शनासाठी थांबून आसपासच्या रम्य परिसरात छायाचित्रणाचा आनंद सर्वांनी लुटला. तिथून संध्याकाळी ५ वाजता कोल्हापूरला परत आल्यावर महालक्ष्मी दर्शन, खरेदी, विश्रांतीसाठी थोडी



मोकळीक होती. रात्रीच्या भोजनापूर्वी दुसऱ्या दिवसाच्या आखणीची छोटेखानी मीटिंग झाली. मीटिंगच्या दरम्यान पेरूचा मनसोक्त आस्वाद घेत एकमेकांची हसत- खेळत मस्करी सुरू होती.

शुक्रवार, दि. २६ ऑक्टोबर २०१८ला पहाटे ४.३० वाजता उठून स्नानादी आन्हिके उरकून इच्छुकांनी श्री महालक्ष्मी मंदिरात अभिषेक करण्यास प्रयाण केले. त्यानंतर मनसोक्त न्याहारी करून ठीक १० वाजता सर्वांनी श्री क्षेत्र गणपतीपुळेकडे प्रस्थान केले. जाताना रस्त्यात अंबा घाटमाथ्यावर लिंबू सरबत, कोकम सरबत व चहाचा आपापल्या आवडीप्रमाणे आस्वाद घेत मर्कटलीलांची मजा अनुभवून पाली, निवळी मार्गे दुपारी १.०० वाजता गणपतीपुळे येथे पोहोचलो. श्री. केळकर बंधू यांच्याकडे दुपारच्या भोजनाची उत्तम व्यवस्था मोदकांच्या मेजवानीसहित केली होती. नंतर श्रींचे मनोहारी दर्शन घेतले. लोकाग्रहास्तव आम्ही सर्वांनी श्रींच्या मंडपात सामूहिक आवर्तन म्हटले. मंदिर परिसरात व समुद्राच्या सान्निध्यात छायाचित्रणाचा आनंद लुटून श्री क्षेत्र लक्ष्मी-पल्लीनाथ पालीकडे प्रयाण केले. सायंकाळी ४.३० वाजता पालीच्या जुन्या देवस्थानात दर्शन घेऊन ५ किलोमीटर अंतरावरील श्री लक्ष्मी पल्लीनाथ मठ येथील नव्या मंदिरातही दर्शन घेऊन ठीक ६.०० वाजता



लांजा येथे थांबलो. लांजा येथील अनेक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्य

करणारे श्री. महेशजी सप्रे यांच्याकडे प्रेमळ आग्रहास्तव चहापान केले. तिथून थेट कशेळीला प्रयाण करून रात्री ९.३० वाजता श्री देव कनकादित्य मंदिराच्या भक्तनिवासात पोहोचून रात्रीच्या साध्याशा पण सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. काही जण थकल्यामुळे निद्राधीन झाले. पण दिवसभराच्या प्रवासानंतरही काही ज्येष्ठ तरुणांनी मात्र कराओके साऊंड सिस्टिमवरील संगीत मैफिलीत हिरीरीने सहभाग घेतला. बऱ्याच जणांनी आपल्या (दबलेल्या) कलागुणांना, गायकीला उजाळा दिला.


शनिवार, दि. २७ ऑक्टोबर २०१८ रोजी पहाटे ५.०० वाजता सर्वांनी श्री देव कनकादित्य सूर्य मंदिरात स्थानिक गावकऱ्यांसोबत काकड आरतीची अनुभूती घेत भक्तिमय वातावरणात दिवसाची मंगलमय सुरुवात केली. त्यानंतर चहा, कॉफी व नाश्त्याचा आस्वाद घेऊन ठीक १०.३० वाजता श्री आर्यादुर्गा देवस्थान- हंसोळकडे प्रयाण केले. आर्यादुर्गा मंदिरातील दर्शनानंतर तिथूनच ५ किलोमीटरवरील भू



नावाच्या गावातील श्री. अनिल पाध्ये व सौ. अदिती पाध्ये या दाम्पत्याच्या समर्थ भोजनालयात पुरणपोळीच्या जेवणाचा आस्वाद घेतला.

तिथून पुढे दुपारी ३.३० वाजता श्री धोपेश्वर देवस्थान- राजापूर येथे दर्शन घेतले. १२ महिने वाहणाऱ्या धोपेश्वर धबधब्यावर व आसपासच्या नयनरम्य परिसरात छायाचित्रणाचा आनंद न लुटताच जाणार ? अशक्य. संध्याकाळी ५.३० वाजता कशेळीच्या खाडीच्या बांधावरील क्षणभर विश्रांती या हॉटेलमध्ये चविष्ट बटाटेवड्याचा, चहा-कॉफीचा आस्वाद घेऊन पुन्हा कशेळीला मुक्कामासाठी कूच केले. मग सूर्यमंदिरात दर्शन घेऊन रात्रीचे साधे पण चवदार जेवण घेऊन सगळेच झोपायला गेले.

रविवार, दि. २८ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी स्नानादी आन्हिके उरकून सूर्य मंदिरातील पहाटे पुन्हा एकदा काकड आरतीची अनुभूती घेऊन चहा, कॉफी व नाश्ता करून आवरून झाल्यावर सूर्यमंदिरात एकत्र जमलो. मंदिरातील एक विश्वस्त, सेवेकरी व भक्तनिवासाचे व्यवस्थापक श्री. अप्पा तथा रमेश ओळकर यांनी सूर्यमंदिराचा इतिहास सांगितला. तेथील ऐतिहासिक प्राचीन ताम्रपट आम्हा सर्वांना दाखवला आणि सर्व प्रवासी भक्तांसाठी श्री कनकादित्य सूर्यनारायणासमोर अत्यंत प्रेमळ, आदरपूर्वक भक्तिभावाने सर्वांच्या सुखासाठी, शांतीसाठी, भरभराटीसाठी गाऱ्हाणं घातलं. त्यानंतर ठीक ९.३० वाजता पावसच्या स्वामी स्वरूपानंद समाधी मंदिराकडे प्रस्थान केलं.



स्वामींच्या समाधिस्थळाचे दर्शन घेऊन ठीक ११.०० वाजता आम्ही परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. पुन्हा अंबाघाटमार्गे अंबा गावातील एका हॉटेलमध्ये दुपारच्या साध्या जेवणाचा आस्वाद घेऊन कोथरूड मार्गे कराडला बंगलोर हायवे पकडून पुण्यातील ४ प्रवाशांना उतरवून एक्स्प्रेस वेवरील टोल नाक्यानंतरच्या नव्या फूड मॉलमधील उडुपी हॉटेलमध्ये रात्रीचे डाळ-खिचडीचे साधे जेवण करून ठाणे येथे पोहोचलो.

श्री आर्यादुर्गा ट्रॅव्हल्सचा संचालक संदीपबरोबर जाण्याच्या आम्हा उभयतांच्या निर्णयाचे पूर्ण समाधान मिळाले, याचा आनंद तर आहेच; पण या सहलीमुळे अनेक चांगल्या स्वभावाची मनमिळावू कुटुंबे मिळून आमचे एक मोठे कुटुंब तयार झाले. या मोठ्या कुटुंबात आम्हा तरुणांना लाजवील अशा उत्साहाचे श्री. प्रदीपजी व सौ. आशाताई पाध्ये, श्री. आनंदजी व सौ. मंजिरीताई खांडेकर, श्री. राजेंद्रजी व सौ. माधुरीताई करंबेळकर, श्री. धनंजयजी व सौ. अश्विनीताई भागवत, श्री. गणेशजी व सौ. शुभदाताई गुर्जर आणि त्यांच्या दोन नाती कुमारी आर्या व कुमारी अनिका, श्री. प्रमोदजी व सौ. मंगलाताई दलाल, श्री. यशवंतजी व सौ. अमृताताई बहुतुले, श्रीमती कयाळ आजी त्यांचा उत्कृष्ट छायाचित्रकार मुलगा श्री. नीलेश कयाळ, श्री. विलासजी काटदरे, श्री. संजयजी आंबडेकर, श्री. वसंतकाका प्रभुदेसाई, श्री. प्रावीणजी आठल्ये, श्री. संजीवजी पळसुले देसाई आणि संपूर्ण प्रवासभर ग्रुप सातत्याने हसरा-खेळता ठेवणारे दोन उमदी व्यक्तिमत्त्वे एक म्हणजे सुप्रसिद्ध व्याख्याते श्री. उदयजी सप्रे व दुसरे म्हणजे श्री. कुमारजी माईणकर या सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आमची ही सहल सुरक्षित, आनंदी, उत्तम दर्जेदार भोजन, नाश्ता, उत्तम निवासव्यवस्था व उत्तम आयोजनाने सफल आणि सुंदरच झाली.

पुन्हा अशाच एका सुंदर सहलीचे आयोजन करण्याची मागणी सहलीतील प्रत्येकानेच केली आहे.

# संघावरील विश्वास आणि दातृत्व यांचा अनोखा संगम.... ७५ लाखांचे दान

गणेश गुर्जर
मो. : ९८९०९ ९०११३

सातारा शहरातील अगदी मोक्याच्या ठिकाणी पोवई नाक्यापासून अगदी जवळ असलेल्या गोडोली येथील युनायटेड वेस्टर्न बँक सोसायटीमधील मुरलीधर सप्रे ह्यांचा बंगला त्यांच्या वारसांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीला विनामोबदला बक्षीस दिला. काल तसे विनामोबदला बक्षीसपत्र त्यांनी जनकल्याण समितीचे प्रांत कार्यवाह श्री. विनायकराव डंबीर ह्यांना दुय्यम निबंधक सातारा कार्यालयात लिहून दिले. सुमारे ७५ लाख रुपये किमतीची ही मोक्याच्या ठिकाणाची मिळकत आहे. माझ्यासारखे अनेक इस्टेट एजंट सप्रे कुटुंबीयांच्या मागे हा बंगला विकण्यासाठी हात धुऊन मागे लागले होते, पण पैशाच्या मोहात न पडता त्यांनी ही मिळकत तिचा योग्य विनिमय व्हावा ह्या हेतूने एक रुपया न घेता जनकल्याण समितीला दिली. सप्रे कुटुंबीय पुणे-मुंबई इथे विखुरलेले आहेत. २७०० चौरस फुटांचा क्लिअर टायटल बिनशेती प्लॉट व त्यावरील एकमजली बंगला असे मिळकतीचे स्वरूप आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीचे मुख्य कार्य हे आपद्‌ग्रस्ताना मदत करणे हे आहे, हे आपण देशभरात वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अनुभवले आहे. लातूर भूकंप असो किंवा नुकतेच केरळमध्ये जे पावसाने थैमान घातले, तेव्हा संघाच्या स्वयंसेवकांनी केलेले मदतकार्य आपण पाहिले आहे. त्यामुळे सामान्य माणसाच्या देखील संघाच्या मदतकार्यावर विश्वास असतो. संघाच्या संस्थेला मी दिलेल्या रुपयारुपयाचा विनियोग योग्य प्रकारे होईल ह्याचा त्याला विश्वास असतो. त्यामुळेच असेल की, सप्रे कुटुंबीयांनी सत्पात्री दान असावे, ह्या हेतूने ही मिळकत संघाच्या जनकल्याण समितीला बक्षीस दिली असावी. अर्थात, ह्यात सप्रे कुटुंबीयांचे योगदान खूप मोठे आहे कारण हल्लीच्या जमान्यात कोणी एक रुपयाही सोडत नाही. तुझं ते माझं आणि माझं ते माझ्या बापाचं, अशी प्रवृत्ती बळावत चालली आहे आणि फुकट मिळत असलेले पैसे कोण सोडेल हो? मी स्वतः या जागी असतो तरी मी सप्रे कुटुंबीयांसारखे वागलो असतो का, तर ह्याचे खात्रीने 'नाही' असे उत्तर मी देऊ शकत नाही. अहो, तुम्ही देवळाच्या दारात उभे राहून बघा पॉश आलिशान गाडीतून देवाला येणारी माणसे, ब्रँडेड कपडे वापरणारी माणसे देवळाच्या बाहेर बसलेल्या भिकाऱ्याला पैसे देताना अगदी हुडकून-हुडकून सुट्टे पैसे देतात. किमान त्या भिकाऱ्याला १० रुपये द्यावेत, म्हणजे तो एखादा वडापाव खाऊन आपली एक वेळचे भूक तरी भागवेल, असा विचार कोणी करीत नाही. मग वारसाहक्काने इतके लाखोंनी सहजासहजी मिळणारे पैसे फुकट सोडून देणे म्हणजे हल्लीच्या जमान्यात मूर्खपणाच वाटावा, अशी परिस्थिती आहे समाजात. पण काही लुकलुकणारे दिवे असतात जे रात्रीच्या अंधारात मार्ग दाखवत असतात, तसे कार्य आहे सप्रे कुटुंबीयांचे. त्यांनी ह्या स्वार्थाने बरबटलेल्या जगात आपल्या कार्याने समाजाला एक मार्ग दाखवला आहे, सत्पात्री दानाचा. हा विश्वास आहे संघावरचा, संघाच्या निरपेक्ष निःस्वार्थी, ध्येयाधिष्ठित समर्पित कार्यावरचा. खरे तर संघ अजून अनेक लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. पुरोगामी लोकांकडून, राजकारणी लोकांकडून संघाला जातीयवादी असे संबोधन मिळते. त्यामुळे जे संघापर्यंत पोहोचू शकत नाहीत, त्यांच्या मनात काही किंतु राहू शकतो; पण अशा लोकांनी थोडा विचार करावा की, जर संघ असे चुकीचं वागत असता तर ही अशी मोक्याची मिळकत संघाला दान मिळाली असती का हो?

मी स्वतः वयाच्या साधारपणे २४ व्या वर्षापासून संघाशी जोडला गेलो होतो. त्यांचे सामाजिक काम मी पाहिलेले आहे. सामाजिक समरसता मंच, स्वरूप साधना, आरोग्यरक्षक अशी अनेक कामे आहेत; ज्याचे मोल होऊ शकत नाही. फेसबुक, व्हाट्स ॲपच्या जमान्यात नव्या पोरांना शाखेत यावे असे वाटावे, असे सध्याचे दिवस नाहीत. परंतु नव्या पिढीतील मुलांना मी Prasad Deshpande, Rahul Apte ह्यांना फॉलो करायला लावतो म्हणजे त्यांना संघाचे विचार कळावेत किंवा संघ विचार वाचायला मिळावेत म्हणून. असो. सप्रे कुटुंबीयांना साष्टांग दंडवत.

---

**तो** – अमोनिया आणि न्यूमोनिया यांत फरक काय?

**ती** – एक बाटलीतून येतो आणि दुसऱ्या छातीतून!

**– श्री. केशव फडणीस, पुणे**

# आयुष्याचे धागेदोरे...

संग्राहक : श्री. वसंत प्रभुदेसाई, मुंबई
मो.नं.९८१९४ १५८९४

आपले आयुष्य ही सुंदर विणकामाची एक नक्षी म्हटले तर नक्कीच वेगळे ठरणार नाही. त्या विणकामातील प्रत्येक धाग्याप्रमाणेच विविध प्रकारची माणसे आपल्या आयुष्यात येत असतात. ती माणसे कशी अन् काय आहेत हे ही आपल्याला माहीत नसते.पण आपले अन् त्याचे कळनकळत धागे दोरे जुळले जातात. कधी आपला त्या व्यक्तीवर प्रभाव पडतो तर कधी आपण त्या व्यक्तीवर प्रभावित होतो. खरं पाहता अमुक व्यक्ती आपल्या आयुष्यात यावी म्हणून किंवा असे ठरवून कोणीच कधीच आपल्या आयुष्यात येत नाही. विधात्याने करोडोलोकांमधून अगदी नेमक्याच व्यक्तीची आपली भेट घडवून आणणे म्हणजे नक्कीच त्याचे कांहीतरी प्रयोजन हे असलेच पाहिजे.

आपल्या आई-वडील, भावंडापासून ते नातेवाईक, आपली मुले, मित्रमैत्रिणी, सहकारी अशा प्रत्येक वळणावर आपल्याला भेटलेली माणसं आपल्या आयुष्याचा एक भाग बनत चाललेली असतात. कधी आपले आयुष्य हे त्यांचे जीवन असते, तर कधी त्यांचे अस्तित्व आपले आयुष्य असते. पण योग्यवेळी योग्य माणसे भेटायलाही नशीबच लागते. आई-वडील मुलीचे अथवा मुलाचे लग्न करून घेताना सर्व बाबींची चौकशी करूनच घेतात; परंतु त्यांच्या आयुष्यातील त्या व्यक्तींमुळे कोणाचे नशीब कुठे नेऊन पोहोचवेल, काही सांगू शकत नाही. संस्कारांचा भाग विचारात घेतला, तर प्रत्येक पालक आपल्या मुलांवर योग्य असेच संस्कार करतात; पण आयुष्याच्या वळणावर कोणते मित्र-मैत्रिणी भेटतील अन् आयुष्य कुठे कलाटणी मारेल याची कांहीच शाश्वती नसते.

बऱ्याच वेळा तर आपल्या आयुष्यात काही माणसं अगदी परिसासारखी भेटतात. त्यांच्या अस्तित्वाने आपले अख्ख्या आयुष्याचेच सोने बनून जाते अन् ती आपल्यासाठी आदर्श ठरतात. काही माणसं तर आयुष्याच्या अशा टप्प्यावर भेटतात, ज्या वेळी आयुष्यच नकोसे वाटलेले असते. पण त्यांच्या अस्तित्वाने जगण्याला एक अर्थ निर्माण होतो. जीवन जगण्याची एक नवी दिशा मिळते. बऱ्याच वेळा तर आयुष्यात अशीही माणसं येतात जी तेवढ्याच काळापुरती मर्यादित असतात. येतात अन् गार हवेच्या झुळकीसरशी निघूनही जातात. अशीही माणसं असतात, ज्यांचे आपल्याभोवतीचे असणे त्याचे अस्तित्वही एवढे त्रासदायक असते की, त्यांच्या आठवणीनेसुद्धा आपल्याला चीड निर्माण होते. पण त्यांनी दिलेल्या कटू अनुभवातून आपण बरेच काही शिकलेलोही असतो. ही माणसे म्हणजे अगदी त्या विणकामातील कठीण गाठीसारखीच असतात. काही माणसे तर आयुष्यात येतात खरी; पण नंतर एवढ्या दूर निघून जातात की, त्यांना शोधायचे म्हटले तरी कधीही भेटू शकत नाहीत- अगदी त्या निसटलेल्या धाग्यासारखी..

पण विणकामातील नक्षी ही तेव्हाच सुंदर दिसू लागते जेव्हा आपल्याला आपल्या मनासारखी माणसं भेटतात. अन् ती नक्कीच भेटतात. फक्त आयुष्याच्या त्या वळणावर ती ओळखता येणे गरजेचे असते. कधी कधी आपण एवढे निराश झालेलो असतो अन् त्या वेळी जगण्यातील आनंदच मावळून गेलेला असतो. जीवनाबद्दलची आस्था संपत चाललेली असते. मग अशा वेळी जर मनासारखी माणसं भेटली, तर आयुष्यातील आनंद सप्तसुरांसारखा गुंजू लागतो. त्या व्यक्तीच्या अस्तित्वाने आपण बहरून जातो.

इथे सांगावीशी वाटते ती गोष्ट म्हणजे, आयुष्यात अचानक येणाऱ्या व्यक्ती या आपल्या मनाचे तर प्रतिबिंब नसतात? बऱ्याच वेळा आपला स्वभाव खूप हळवा असतो अन् आपल्या सहवासात येणाऱ्या बऱ्याच व्यक्तीही हळव्याच असतात. कधी कधी आपल्याला मुक्तपणे, स्वच्छंदी वागायला आवडते; तर अनपेक्षितपणे अगदी आपली मैत्रीही तशाच व्यक्तीशी होते. ज्या व्यक्तीशी आपले कधीच पटत नाही, त्या व्यक्तीचे अस्तित्व म्हणजे विणकामातील सुईत धागा नसल्या-प्रमाणेच आपण वगळून टाकलेले असते. विणकामाची नक्षी बनवायचे काम त्या विधात्याने हाती घेतलेलेच असते; पण आकर्षक नक्षी बनवण्यासाठी कोणते धागेदोरे घ्यायचे अन् कोणते सोडायचे, हे ज्याचे - त्याने ठरवायचे असते.

आनंदच मावळून गेलेला असतो. जीवनाबद्दलची आस्था संपत चाललेली असते. मग अशावेळी जर मनासारखी माणसं भेटली तर आयुष्यातील आनंद त्या सप्तसुरांसारखा गुंजू लागतो. त्या व्यक्तीच्या अस्तित्वाने आपण बहरून निघतो.

# ‘यशस्वी उद्योजक’
# खमंग काटदरे

– श्री. बाळसाहेब भाटे, सातारा
मो.नं. ९४२२४ ०२६४९

सातारा म्हटले की, जे-जे काही डोळ्यांसमोर येते, त्यामध्ये काटदरे मसालेवाले हे नाव आज अग्रभागी आहे. कधी काळी या छोट्याशा शहरात स्वतःचा खमंगपणा रुजवणारा हा ‘ब्रँड’ आता देश-विदेशात अनेकांसाठी चविष्ट ओळख झाला आहे.

मंगळवार पेठेत कोल्हटकर आळीतून काळा राम मंदिराकडे आपण वळलो की, तिथेच आपली पावले थबकतात. मसाल्याच्या खमंग वासाने आपण क्षणभर रेंगाळतो. पोटभर जेवण झालं असलं, तरी या चवीचा आस्वाद घ्यायला परत पानावर बसावंसं वाटतं. वास सातारकरांच्या तसा ओळखीचा, तरीही दर वेळी ते तिथून जाताना काही काळ मोहरून जातात आणि मग प्रत्येकाच्या ओठावर सहजच एक नाव येते काटदरे मसालेवाले!

गेल्या साठ वर्षांत तीन पिढ्यांनी घेतलेले कष्ट, प्रामाणिकपणा, सचोटी, चवीशी बांधिलकी आणि जपलेली व्यावसायिक मूल्ये या साऱ्यांचे हे यश आहे.

‘काटदरे मसालेवाले’ या व्यावसायिक कथेची सुरुवात झाली १९८५ मध्ये. बाळूकाका काटदरे यांनी याची मुहूर्तमेढ रोवली. डोक्यावरचा कर्जाचा बोजा उतरवण्यासाठी घरगुती मसाल्यांची विक्री करायचे त्यांनी ठरविले. बाळूकाकांच्या पत्नी प्रमिलाताई या घरी मसाले तयार करत. त्या वेळी हे कुटुंब मसूर येथे राहत होते. पण या छोट्या गावामधून मसाले कोण विकत घेणार? तेव्हा मग हा तयार मसाला घेऊन बाळूकाका साताऱ्याला यायचे. रोजचे उत्पादन १० किलो मसाल्याचे. हा मसाला घेऊन मसूर ते उंब्रज हे सहा किलोमीटर अंतर सायकलवर, नंतर मग उंब्रजहून साताऱ्यापर्यंत एस.टी.ने आणि मग साताऱ्यात दिवसभर व्यापाऱ्यांकडे फिरून विक्री- असा हा या ‘काटदरे मसालेवाले’ कथेचा पायारव आहे.

पदरी ५ मुलं, बंद पडलेलं किराणा मालाचं दुकान, डोक्यावर कर्जाचा बोजा, मसाला व्यावसायासाठी बायकोचे दागिने विकलेले... अशा परिस्थितीत विक्री होत होती ती दिवसाकाठी केवळ दोन किलो मसाल्याची. पण या माणसाकडे दृष्टी होती, व्यावसायिक दृष्टिकोन होता, काळाची पावले ओळखण्याचा द्रष्टेपणा होता. अत्यंत कष्टाळू अशा पत्नीची साथ आणि द. पा. आफळे, भाऊ आणि अण्णा साखळांकरांसारखे स्नेही या बळावर बाळूकाकांनी १९८५ मध्ये साताऱ्याला एक जागा भाडेतत्त्वावर घेऊन मसाले व्यवसायाला स्थायी रूप दिले. व्यवसाय हळूहळू वाढायला लागला. बाळूकाकांचा मोठा मुलगा अनिल यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत या व्यवसायात पदार्पण केले. वडिलांसोबत खांद्याला खांदा भिडवून उभं राहत त्यांनी व्यवसायाच्या खाचाखोचा समजून घेतल्या. कामाची पद्धत अंगीकारली. आई-वडिलांकडून माणसं सांभाळायचे बाळकडू घेतले. दरम्यान काळही आपली कूस पालटत होता. सुशिक्षित स्त्री संसाराच्या हातभारासाठी बँका, शाळा, आदी ठिकाणी चमकू लागली होती. पण ही नोकरीदेखील घरकाम, स्वयंपाक सांभाळून! तिचे काम सुखकर होण्यात ‘काटदरे’चे हात मदतीला आले. अत्यंत चविष्ट, रुचकर, घरगुती चवीचे हे मसाले या गृहिणींचे साथीदार बनले. अनिल काटदरेंनी मंडईमध्ये आणखी एक दुकान सरू केले त्यामुळे भाजी खरेदीला आलेली माणसे जवळच मिळणारा हा मसाला घेऊन घरी परतू लागली. विक्री वाढली असली, तरी या मसाल्याच्या वेष्टणाचं रुपडं पालटलं नव्हतं. मसाले, चटणी, मेतकूट हे कागदाच्या पुडीतूनच घरी जात होतं. १९७५ च्या दरम्यान अनिल यांचे धाकटे बंधू अशोक यांनी पुण्यात या उत्पादनाची विक्री करायचं ठरवलं, तेव्हा या पुड्यांची जागा चांगल्या वेष्टणाने घेतली. त्यावर काटदरे हे नाव झळकायला लागलं.

पुढे अनिल काटदरे यांच्या पत्नी शैलजा यांच्या येण्याने सुरुवात झालेल्या या चवीच्या परिवारात आता मेतकूट, शेंगदाणा चटणी, जवस चटणी, कांदा-लसूण मसाला, गोडा मसाला अशी भर पडत गेली. स्वच्छता आणि चवीशी कसलीही तडजोड न केल्याने मागणी वाढतच होती. आता बाळूकाका मंडईच्या दुकानात बसून व्यवसाय बघत आणि अनिल काटदरे हे स्वतः व्यापाऱ्यांना उत्पादन पोहोचवत होते. मागणी वाढली तसे उत्पादन वाढवण्याची गरज निर्माण झाली. मग याच टप्प्यावर व्यवसायात आधुनिकीकरणाने प्रवेश केला. पहिलं मशिन घेतलं ते कांदा-लसूण मसाल्याचं. उत्पादनानत चांगलीच वाढ झाली. दरम्यान, याच वेळी अनिल काटदरे यांचा मुलगा पराग याने व्यवसायात पदार्पण केले. बाळूकाका-प्रमिलाकाकू, अनिलराव-शैलजाताई आणि आता ही तिसरी पिढी पराग-दीपा!

बाळूकाकांची कन्या कुंदा व त्यांच्या सासूबाईंनी या व्यवसायाला पूरक असा तयार पिठे व भाजणीचा व्यवसाय सुरू केला. अभिरुची या नावाने या गृहउद्योगात पदार्पण झाले. पसारा वाढत गेला. दिवसामागे वाढती मागणी वाढते उत्पादन आणि त्यानुसार व्यवसायातील बदल या साऱ्यातून काटदरे मसालेवाले हा ब्रँड कधी तयार झाला, हे या कुटुंबालादेखील कळले नाही.

एके काळी १० किलो रोजचे उत्पादन करणारा हा उद्योग आज रोज अडीच टनाचे उत्पादन करतो. कधी मसूर येथे घरगुती स्वरूपात तयार होणारा मसाला व्यवसाय पुढे साताऱ्यातील भाड्याची जागा, मग स्वतःची वास्तू, पुढे कारखाना आणि आज सातारा एम.आय.डी.सी.-मध्ये स्वतःच्या जागेत पाय रोवून उभा आहे. अत्याधुनिक यंत्रणेने सज्ज हा कारखाना 'आयएसओ-२२०००'चे नामांकन मिळवलेला आहे. एके काळी कुटुंबाचा चरितार्थ चालावा म्हणून सुरू झालेला व्यवसाय आज १००हून अधिक कुटुंबांना रोजगार देतो आहे, त्यांच्या कुटबाचा पोषणकर्ता बनला आहे. त्यांच्या अडी-अडचणीला खंबीरपणे साथ देतो आहे, कोलमडून टाकणाऱ्या क्षणाला सावरतो आहे. शिक्षणासाठी, कोडकौतुकासाठी हात सदैव पुढे आहे. कधी काळी सायकलवर फिरुन रिक्षा चालवून मसाला विक्री करणाऱ्या या उत्पादनांची विक्री आज ५ ते ६ हजार छोटे विक्रेते करत आहेत. शिवाय त्यांची स्वतःची ३ मोठी सुसज्ज अशी विक्री केंद्रे आहेतच, जिथे ग्राहकांची अखंड वर्दळ सुरू असते. १९९२ मध्ये बाळूकाकांचे तर २००० मध्ये प्रमिलाताई यांचे निधन झाले. व्यवसायाचा बसलेला जम, मुलाने दिलेली व्यापक दृष्टी, समाधानी ग्राहक हे सगळं या दोघांनीही जवळून पाहिलं. आज अनिलराव-शैलजाताई आणि पराग-दीपा हे सारे मिळून हा उद्योग पुढे नेत आहेत. शिवाय बाळूकाकांच्या अन्य नातवंडांपैकी अतुल हे तयार पिठांचे उत्पादक आहेत, तर मयूर खेर हे वितरणाची जबाबदारी घेत ती आघाडी सांभाळतात. कारखान्याची जबाबदारी पराग आणि दीपा यांनी घेतली आहे. कार्यप्रणालीचे विविध प्रयोग, आधुनिकीकरण, प्रशिक्षित कामगारवर्ग, कामगारांमधील संघटन आणि उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी ट्रेनिंग प्रोग्राम या साऱ्यातून हा उद्योग नव्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी तयार होतो आहे. छोटे बचत गट ते नामांकित ब्रँड असे स्पर्धक त्यांना आहेत. पण स्वतःचे उत्पादन आणि दर्जावर पूर्ण विश्वास असलेले काटदरे बदललेल्या ट्रेंडला संधी मानतात आणि तिचा पुरेपूर उपयोगही करतात.

चवीचं प्रमाणीकरण हा विषय आजही मोठ्या आव्हानाचा आहे. तो विषय हातचा स्पर्श आणि 'तयारीचे अनुभवी डोळे' यावरच आधारित आहे. मसाला किती भाजायचा, रंग कसा आला पाहिजे, प्रमाण काय हवं- ही सारी व्यावसायिक गुपिते एका पिढीने दुसऱ्या पिढीला, दुसऱ्या पिढीने तिसऱ्या पिढीला दिली. कसंलही व्यावसायिक प्रशिक्षण न घेता चव टिकवून ठेवणं सोपं नाही. आज काटदरेंची ४० विविध उत्पादने गृहिणीला सुगरण होण्यासाठी मदत करत आहेत. उत्पादनवाढीबरोबरच नवनवीन शहरांत माल वितरित करणे, देशभरातील नामांकित मॉलसाठी उत्पादन करणे आणि अतीव श्रमातून तयार झालेले हे मसाले सातासमुद्रापार निर्यात करणे, असा मोठा पसारा आहे. देशभरातील नामांकित ब्रँडसोबत काम करणे, डिजिटल मार्केटिंगचा उपयोग करत जगभरात काटदरे मसालेवाले हा ब्रँड पोहोचवण्याचा प्रयत्न आहे. बी. ए. काटदरे ट्रस्टची स्थापना करून या कुटुंबाने सामाजिक बांधिलकीही जपली आहे. याद्वारे कामगारांना पुरस्कार, गुणी विद्यार्थ्यांचे कौतुक, अडी-अडचणीला मदत केली जाते. समाजातील अनेक गरजू संस्थांना या ट्रस्टतर्फे गणेशोत्सवादरम्यान प्रसिद्ध होणाऱ्या 'सर्व कार्येषू सर्वदा' यातील संस्थाना, तसेच रा. स्व. संघ, जनकल्याण समिती अशा अनेक सेवाभावी संस्थांना या ट्रस्टतर्फे दर वर्षी ठरावीक रकमेचा निधी पोहोचता होतो.

काळाची पावले ओळखण्याचा द्रष्टेपणा तिसऱ्या पिढीतही जसाच्या तसा आला आहे. सचोटी, प्रामाणिकपणा रक्तात आहेच. व्यावसायिक चातुर्य पिढीगणिक चालत आलंय. आता काटदरे मसालेवाले तयारनिशी सज्ज आहेत. उद्योगाची नवनवी क्षितिजे गाठायला.

कारखान्यांमध्ये 'लीन टेक्नॉलाजी'चा उपयोग सर्वप्रथम करणाऱ्या 'क्लस्टर'मध्ये काटदरेंच्याही क्लस्टरचा समावेश होतो. हे तंत्र इंजिनिअरिंगमध्ये वापरले जाते. खाद्य उद्योगामध्ये सहसा वापरले जात नाही. काटदरेंनी ही मॅनेजमेंट अत्यंत प्रभावीपणे राबवली. 'नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल'तर्फे एक 'केस स्टडी' करण्यात आला. या राबवण्याने प्रभावित होऊन 'लीन मॅनेजमेंट' हे खाद्य उद्योगात कसे वापरावे, हे इंग्लंड कॉलेजमध्ये शिकवले जाते. काटदरेंच्या या 'केस स्टडी'चा त्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे. सातसमुद्रपार कीर्ती पोहोचली आहेच.

**क्लीन बोल्ड**

**चिरंजीव** - बाबा, बघा माझ्या मास्तरांनीही माझ्या क्रिकेटचे कौतुक केले आहे. त्यांनी पेपरवर तीन स्टंप्स काढून दिल्या आहेत.

**बाबा** - मूर्खा, त्रिफळा म्हणून तुझा निकाल दाखवला आहे त्यांनी!

**- श्री. केशव फडणीस, पुणे**


# तरुणाई

– श्री. राजेंद्र करंबेळकर, ठाणे
मो.नं.९८२०२ ४२५३०

मॉर्निंग वॉकला गेलो होतो. तळ्याला चार फेऱ्या मारल्यावर बसलो, तेवढ्यात बाजूनी आवाज आला.

''काय रे मन्या, आज कवळी विसरलास का रे?''

खणखणीत आवाजातले हे वाक्य ऐकलं आणि गरकन मान वळवली. तळ्याच्या काठावर आठ-दहा सत्तर ऐंशीच्या घरातले तरुण बसलेले आणि बर्म्युडा आणि टी-शर्ट घालून येणाऱ्या मन्याकडे बघून फिदीफिदी हसत होते.



मन्या त्यांना म्हणाला, ''हसा लेको, ज्याची जळते त्यालाच कळते! यथएसला गेलो होतो, येताना कवळीच विसरलो, पाठवलीय मुलानं कुरियरनी, पण अजून आली नाहीये. तीन दिवस झाले, पेज खातोय. तुम्हाला काय होतंय खोटे दात काढायला!''

तेवढ्यात एक लेंगा आणि सदरा घातलेले आजोबा उठले आणि लटक्या रागानं म्हणाले, ''खोटे दात काय रे, हे बघ'' म्हणत बोळक उघडलं, तर टेडी बिअर सारखे दोन दात लुकलुकत होते, बाकी सगळं वाळवंट!

''दात दोनच असले, तरी कडक बुंदीचा लाडू खातो अजून!''

''खातोस की चघळतोस रे?''

ख्या-ख्या करून सगळे हसले.

''नान्या चघळतोस तू लेका. काल घरी जाताना चार शेंगदाणे तोंडात टाकलेस, ते संध्याकाळी देवळात आलास तरी चघळतच होतास! ह्वे ऽ ह्वे ऽ ह्वेऽ.

''हाट, ते साखर फुटाणे होते देवळातले!'' असे मस्त संवाद चालू होते.

मग नादच लागला मला रोज त्यांच्या गप्पा ऐकण्याचा.

जवळपास पाच-सहा महिने झाले असतील मला त्यांच्या गप्पा ऐकता-ऐकता. पण कधी कोणाची कुरबुर ऐकली नाही.

फक्त नोटबंदी झाली त्या वेळेस, नाना तावातावाने भांडले होते.

''शिंच्या त्या मोदीने माझं पितळ उघडे पाडलन्! बायकोपासून लपवून ठेवलेले दोन हजार रुपये काढायला लावलें हो ऽ''

''बॅग, लपवायचे कशाला म्हणतो मी? मी बघ-निघताना बायकोपुढे रोज भिक्षांदेही करतो, ठेवते २०-२५ रुपये हातावर, तेवढीच आपली विडी-काडीची सोय! काय?''

एक दिवस अचानक सगळाच्या सगळा ग्रुप गैरहजर!

त्यानंतर माझ्या कामामुळे मला दोन तीन दिवस जमलं नाही, चौथ्या दिवशी गेलो तर सगळे हजर!

त्यातल्या तात्यांना विचारलं, ''काय हो परवा कोणीच आला नाहीत?''

तर थेट अंतू बर्व्यास्टाईल उत्तर नानांनी दिले-

''अरे, मन्याची ट्रान्सफर झाली ना! त्यालाच सोडायला गेलो होतो''

''कुठे??''

''अरे, कुठे म्हणून काय विचारतोस? स्वर्गात! त्याच्या महायात्रेला गेलो होतो सगळे!''

काही म्हणा, ''मन्या भाग्यवान हो! लेक अमेरिकेतून येतो काय, हाटीलात जाऊन पार्टी करतात काय, घरी येऊन झोपतो काय, आणि मुलगा उठवायला गेला तर हा मन्या केव्हाच गेलेला- स्वर्गाचं दार वाजवायला, रंभेच्या मागं!''

बाकी सगळे खिन्नपणे हसले.

मी म्हटलं, ''तात्या, इतकं लाईटली घेताय?''

''अरे तू आता आलास. आधी आम्ही सव्वीस जणं होतो, आता बाराच उरलोय! तेही ऐंशी नव्वदीचे! विकेटी पडायच्याच रे. आणि म्हणून रडायचं कशाला? दोन दिवस दुःख वाटतं, पण 'जन पळभर म्हणतील हाय हाय' म्हणून सोडून आपलं रुटीन चालू करायचं!''

एकदम काहीसं आठवून मला म्हणाले, ''तू केटरिंग करतोस ना रे? तुझा नंबर दे,

मन्याच्या मुलाला देतो. तेराव्याची ऑर्डर देईल तुला!''

मी डोक्याला हात लावला. ते बघून अजून एक आजोबा म्हणाले, ''अरे आपल्या सगळ्यांच्याच मुलांना देऊया याचा नंबर. वर्षभरात अजून दोन-चार तरी विकेट पडणार! ख्या ऽ ख्या ऽ ख्याऽ!''

दोन दिवसांनी मी जरा घाईत होतो, तेवढ्यात तात्यांनी हाक मारली, ''ओ केटरर जरा इकडे या, आज संध्याकाळची ऑर्डर घेणार का पार्टीची?''

''पार्टी?''

''अरे, नान्याच्या सेंच्युरीला फक्त अकरा वर्षं उरलीत!''

माझा प्रश्नार्थक चेहरा बघून मला म्हणाले, ''एवढा कसा बावळट रे? आज नान्याचा एकोण नव्वदावा प्रकटदिन आहे,''

''फार काही नको, मस्तपैकी लुसलुशीत उपमा आणि चहा, बारा प्लेट बास एवढंच ना? दिलं!''

''आणि हो, कडक बुंदीचे पाच लाडू! आज बघतोच कसा खातो ते!''

''आणि हो, उपमा जास्त तिखट नको हो, हिरड्या झोंबतात नंतर आणि त्यात उडदाची डाळ बिलकुल नको, कवळी खाली जाऊन बसते, मग जीव जातो काढताना!''

संध्याकाळी ऑर्डर द्यायला गेलो आणि चकित झालो. सगळे थट्टा-मस्करी करीत बसले होते. मन्याच्या फोटो समोर काही चाफ्याची फुलं होती आणि मोठमोठ्यांदा गाणं चालू होतं.-

''जिंदगी एक सफर है सुहाना, यहा कल क्या हो किसने जाना ऽऽ''

मला बघून सगळे थांबले. तात्या पुढे झाले. उपम्याची मूद एकेका बशीत वाढून घेतली, चहा कपांत ओतला, सगळे उभे राहिले आणि ''लॉंग लिव्ह नान्या, थ्री चिअर्स फॉर नाना, हिप हिप ऽ हुर्रेऽऽ, हिप हिप हुर्रे, हिप हिप हुर्रे ऽऽ'' करत चहाचे कप, एकमेकांवर आदळून पुन्हा दुसरं गाणं सुरू!

मी काहीशा संभ्रमावस्थेत घरी आलो आणि विचार करू लागलो- आज आपण आपल्या कट्ट्यावर भेटतो, पण आपल्या आयुष्याच्या तिन्ही सांजेला असेच हसतमुख, इतकेच जिंदादिल असू का? ह्या म्हाताऱ्यांइतकीच तरुणाई आपल्यात असेल??

असायलाच हवी!

आणि एकदम त्यांच्या पार्टीतलं मी निघतानाच गाणं ओठावर आलं,

**कल खेल में, हम हों न हों**

**गर्दिश में तारे रहेंगे सदा**

**भूलोगे तुम, भूलेंगे वो**

**पर हम तुम्हारे रहेंगे सदा**

**रहेंगे यहीं, अपने निशाँ,**

**इसके सिवा जाना कहाँ**

**जी चाहे जब हमको आवाज़ दो**

**हम हैं वहीं, हम थे जहाँ**

**अपने यहीं दोनों जहां**

**इसके सिवा जाना कहाँ**

**जीना यहाँ मरना यहाँ,**

**इसके सिवा जाना कहाँ!!**

## कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क' त्रैमासिक नव-निर्वाचित संपादक मंडळ

दि. २३/१२/२०१८ रोजी डोंबिवली येथे महासंघाची सभा झाली या सभेमध्ये 'संपर्क' या त्रैमासिकाची नवीन कार्यकारिणी नियुक्त करण्यांत आली. या 'संपर्क' त्रैमासिकाची पुणेसंघ जबाबदारी पहात असून आता या नवनिर्वाचित संपादक मंडळाची नांवे आणि हुद्दा-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हेमंत पुरणिक | संपादक, पुणे | ९९२३८ १०१९४ |
| २. | श्री. गोपाळ भाटवडेकर | उपसंपादक, पुणे | ९८५०९ ९७७०६ |
| ३. | श्री. ऋषिकेश पळसुले | सभासद, पुणे | ९४०३७ ०२७३४ |
| ४. | सौ. मेघना नाटेकर | सभासद, पुणे | ७३५०७ ८८८२५ |
| ५. | श्री. गणेश गुर्जर | प्रकाशक, पुणे | ८१४९९ ०७७८९ |
| ६. | श्री. सचिन ताटके | तंत्रज्ञ-सभा, ठाणे | ९८६७१ ९२३१० |
| ७. | श्री. प्रदिप हळबे | सभासद, डोंबिवली | ९८३३१ ६३६५९ |
| ८. | श्री. अविनाश मणेरीकर | सभासद, पुणे | ९४२२३ ७९८९८ |

वरील कार्यकारिणीस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली

सूचक - श्री. प्रसाद पंडीत, मुंबई अनुमोदक - श्री. नरेंद्र ताटके, नाशिक

## बाळशास्त्री जांभेकर स्मारकासाठी तीन कोटीचा निधी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, सिंधुदुर्ग नगरी ओरोस येथे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या जागेवर बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मारक व पत्रकार संघाच्या जागेवर बाळशास्त्री



जांभेकर यांचे स्मारक व पत्रकार भवन बांधण्यात येणार आहे. या स्मारकासाठी आणि पत्रकार भवन बांधण्यासाठी रु. ४ कोटी ५५ लाख रूपयांच्या आरखाड्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येऊन महाराष्ट्र राज्य सरकारने यासाठी रू. ३ कोटी निधी जांभेकर शास्त्रींच्या जन्म शताब्दी वर्षात मंजूर केला अशा प्रकारे जांभेकर शास्त्रींचा मरणोत्तर सन्मान करण्यांत आला.

# खडूचे अभंग

डॉ. श्रीकृष्ण जोशी, रत्नागिरी
भ्रमणध्वनी : ९४२३८ ७५८०६

अजून तरी शिक्षण क्षेत्रांत अपरिहार्य असणारी मौलिक वस्तू म्हणजे खडू! स्वतः झिजणारा आणि झिजता-झिजता अनेकांना काही तरी देऊन जाणारा. त्याच्या अस्तिवाशिवाय आणि स्पर्शाशिवाय शिक्षकाचे व्यक्तिमत्व आकाराला येऊ शकत नाही, इतकी त्याची अपरिहार्यता. परस्परावलं बिनतत्वाचा आदर्श नमुना म्हणजे खडू आणि शिक्षक.

आता खडूचे अभंगच कशाला? का?

अभंग हा संतांनी दिलेला वारसा आहे. आडरानी निघालेल्या जनांच्या प्रवाहाला पुन्हा राजमार्गावर आणण्यासाठी संत-सज्जनांनी अभंगाचाच आधार घेतला. अभंग हे वृत्त नाही, तर ती एक वृत्ती आहे. समृद्ध जीवन जगण्यासाठी ती एक मौल्यवान शक्ती आहे, असे खडूला वाटते म्हणून खडूचे अभंग!

मागील ऑक्टो-डिसेंबर १८ च्या अंकात ५ खडूचे अभंग दिले होते. आता यापुढील अंकात प्रस्तावनेशिवाय हे 'खडूचे अभंग' आपल्याला निश्चितच कांही तरी शिकवण देऊन जातील.

**अभंग ६**

पावलोपावली । ज्ञानियांची रांग ।
नित्याचाच संग । बरे वाटे ।।
आणि वाटे मनी । सार्थकी आयुष्य ।
पेलेल धनुष्य? प्रश्न पडे ।।
सुखाची सावली । थकला शोधून ।
इथे मिळे जाण । खात्री वाटे ।।
स्वप्न इवलेसे । तयाच्या मनाशी ।
जपले उराशी । काळजीने ।।
क्षितिजाचे भान । उरले ना जया ।।
जाणार तो वाया । खडू म्हणे ।।

काही तरी करावं, करून दाखवावं. संवेदना काहीजवळ असते. शाळा हे



त्यांचे नंदनवन असत. पण नंदनवन हे स्वप्न असतं, हे त्यांना ठाऊक नसतं. स्वभोवतालच्या स्वार्थी जगात त्यांना त्याचं भान नसतं. त्यामुळे त्यांचं क्षितिज नेहमीच दूर-दूर जात असतं. आणि नंदनवन फुलवण्याचे स्वप्न स्वप्नच रहात!

**अभंग सात**

ओळखीचे सारे । सगळेच चोर ।
घाव उरावर । पुन्हा ताजे ।।
हासे भवताल । मला पुन्हा पुन्हा ।
असा कसा तान्हा । राहिलो मी ।।
हसावे रडावे । दुःख न करावे ।
चिंतामुक्त व्हावे । सांगे कुणी ।।
चिंतेचे श्वापद । भलते लोचट ।
रात्र घनदाटे । दिसो लागे ।।
दैवाच्या खेळाची । निराळी गंमत ।
मोजावी किंमत । खडू म्हणे ।।

ध्येयवाद-आशावाद घेऊन जगणाऱ्यांचं आयुष्य काही वेगळंच असतं. विशेषतः नव्या उमेदीनं काही तरी विधायक घडविण्याच्या हेतूनं आले, त्यांना विपरीत अनुभवांना सामोरं जावं लागतं. त्यांचा ध्येयवाद हा इतरांच्या कुचेष्टांचा विषय ठरतो. सर्वार्थाने चिंतेचे श्वापद त्याच्या पाठी लागतं.

**अभंग आठ**

कवेत मावेना । ऐसे थोर ज्ञान।
कोणाचे घेईन । झाले होते ।।
उज्ज्वल भविष्य । ज्ञानानेच साध्य ।
दैवत आराध्य । शाळेमध्ये ।।
रस्ता साधा सोपा । शाळेला जातसे ।
लागले हे पिसे । बालपणी ।।
सोबत्यांची हाळी । ऐकली न कानी।
हसे झाले जनी । आत्ता कळे।।
हळवे कोवळे । दिवस न आता ।
जाण रे तत्त्वता । खडू म्हणे ।।

विद्यार्थी म्हणून शाळेची ओढ लागणे स्वाभाविकच. खऱ्या ज्ञानार्थाची ती ओळखच. पण बदलत्या जगात-युगात शाळेव्यतिरिक्त अन्य काही मोह असतात. ते टाळणारा खुळा ठरतो. हळवा-भाबडा ठरतो.

**अभंग नऊ :**

चला उभे राहू । नका हालू कोणी ।

वाहू चला झणी । श्रद्धांजली ।।
कोण कधी गेला । हवेच कशाला ।
येथे 'आला' गेला । नेहमीचा ।।
बरा वेळ गेला । इतुकी भावना ।
सुटी का मिळेना । प्रश्न मनी ।।
मुठी वळलेल्या । नजरा समोर ।
फोटो वरी हार । फक्त हाले ।।
मेंढरे सगळी । उड्या नित्य घेती ।
गुंग येथे माती । खडू म्हणे ।।

भावना-संवेदना संपल्या जणू. कुणी 'गेलेल्या' सारखं एक मिनिट उभा राहणं हे यांत्रिकं झालं आहे. 'जाणाऱ्याच्या' निमित्तानं मिळणाऱ्या सुट्टीचा, काम टाळण्याचा विचार महत्त्वाचा. संवेदनक्षम माणसाची मती गुंग होणारच.

**अभंग दहा**

स्पर्धेमध्ये कोण । जिंकला हरला।
कशाचे कुणाला । काही नसे ।।
खेळती खेळाडू । मैदाने गर्जती ।
घाम ही गाळती । स्पर्धा मिषे ।।
छबीसाठी आम्ही । खेळाडू ते पाठी ।
छबी छान मोठी । हवी आम्हा ।।
वर्तमानपत्री । येते सदा नांव ।
प्रसिद्धीची हाव । मुळीच ना(!)
सांगायला असे । कचरे ना कोणी ।
खंत हो मनी । खडू म्हणे ।।

कौतुक कुणाचे करावे, प्रसिद्धीसाठी कुणाला वेळी धरावे हे ज्याला कळते, तोच खरा शिक्षणमहर्षी. प्रसिद्धी हा शेवटी ऑक्सिजन असतो अशा महर्षींसाठी.

# इद्यापीठ

**श्री. दीपक पेंढारकर,**
फलटण, जि. सातारा

ठकवाडीचे बुवा पाटील आपल्या वाड्यात सचिंत बसले होते. सरपंच पदासाठी अर्ज करताना 'वाडीत ज्युनिअर कॉलेज आणणारच!' अशी जाहीर सभेत घोषणा केली होती. पण प्रत्यक्षात काही आले नव्हते. वाडीतील मुले तीस किमी. असलेल्या रामवाडीत कॉलेजला जात होती. तिथला आमदार तगडा होता नि त्याने ज्युनिअर कॉलेज मंजूर करून घेतले होते.

तेवढ्यात त्यांचे चिरंजीव बाळासाहेब आले ते पदवीधर होते. बाळासाहेब, कॉलेजचे काय झाले? निवडणूक आली, लोक विचारणार; मी काय उत्तर देऊ? पाच वर्षांत काहीच केले नाही, असा प्रचार होईल'' बाळासाहेब म्हणाले ''त्याची परवानगी इद्यापीठ देते. सर्व चौकशी करून अहवाल तयार करतात. दहावीची किती मुले कॉलेजमध्ये येतील, हाही प्रश्न विचारला जातो. पाच-पन्नास मुलांकरिता कॉलेज काढले जात नाही. पुन्हा रामवाडीचे कॉलेज असताना नवे कॉलेज हवे कशाला, हा प्रश्न विचारला जाईल. तेव्हा हे शक्य नाही.

''रामवाडीचे कॉलेज अपघाताने काढले म्हणून आपल्याला कॉलेज मिळत नाही, हे मी कसे सांगू? पण परिस्थिती कशी आहे, हे मी बोलायला हवेच.'' बाळासाहेब म्हणाले.

''बाळासाहेब, ते इद्यापीठ केवढ्याला इकत मिळत? दोन-पाच लाख त्यात घालवू, पण ठकवाडीला कॉलेज व्हायलाच पाहिजे. हा माझा प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. तेव्हा हे व्हायलाच हवे!''

''आत्ता! इद्यापीठ दोन-पाच लाखाला विकत मिळत नाही. ती वेगळी संस्था, शिक्षणसाह्याची असते. त्यांचेमार्फत अर्ज, कारभार चालतो; तेव्हा ते विकत वगैरे घेता येत नाही.

''तुम्ही हे स्पष्ट सांगा व सर्व दोष त्या रामवाडीच्या आमदारांना द्या. लोकांना ते पटेल. तुम्ही खूप प्रयत्न केले, पण यश आले नाही असे म्हणा. आपली इतर कामे दाखवा व पुढे काय करणार, हेही बोला. पण कॉलेजचा प्रश्न ठरवून स्पष्ट बोला. लोक सर्व विसणार व आपण पुन्हा निवडून येऊ. पाच-पन्नास हजार खर्च करायचे, ते आपण खूपच कमावले आहेत.''

बुवांना हे पटले. मळ्यात कांदा व सर्व धंदे केले. पण उदक पिताना दे सर्व काढून ठेवत. सर्व झाल्यावर अंघोळ करून विठोबाचे नाव घेत माळ घालत, कपाळावर कायम भस्म लावत. गावात एक हट्टीपणा त्यांनी ठेवला होता. कुणी त्यांना म्हटलं की म्हणायचे की, कुणी एक भाकरीवर जगतो, कोणाला दोन भाकरी लागतात. भाकरी दररोज वाढते. खाडा चालत नाही. तेव्हा ते नावातच बुवा होते, पण सरपंच आपण व्हायला हवेच, हा अट्टहास कायम होता.

बुवा आजारी पडले. आपण सरपंच होत नाही, हे त्यांना कळले. त्यांना हॉस्पिटलमध्ये भरती केले होते. झोप नाही, कॉलेजचा विचार. बुवांचा आजार वाढला. बुवा स्वर्गवासी झाले. मोठी प्रेतयात्रा निघाली. पिंडदानावेळी कावळा शिवेना. मग बाळासाहेबांनी पिंड उचलला व नेम धरून मारला. बुवा व कावळा दोघेही स्वर्गात गेले.

# पुण्यातील पेठांची यादी व माहिती (इतिहास)

प्रमोद तांबे, पुणे
मो. : ८४४६३५३८०५

| पेठेचे नाव | पेठ कोणी वसविली | कोणत्या वर्षी वसविली | नावामागचे कारण |
|---|---|---|---|
| कसबा पेठ | राष्ट्रकूट राजे | ५ व्या शतकात | |
| गुरुवार पेठ | शहाजीराजे | १६२५ | |
| सोमवार पेठ | दादोजी कोंडदेव | १६३६ | |
| मंगळवार पेठ | दादोजी कोंडदेव | १६३७ | |
| शुक्रवार पेठ | निळोपंत मुजुमदार | १६७० | |
| रविवार पेठ | निळोपंत मुजुमदार | १६७० | |
| शनिवार पेठ | मोरोपंत पिंगळे | १६७५ | |
| भवानी पेठ | संभाजीमहाराज | १६८२ | भवानीमातेच्या मंदिरावरून नाव पडले |
| घोरपडे पेठ | सेनापती संताजी घोरपडे | १६९२ | त्यांचे स्मरणार्थ |
| बुधवार पेठ | औरंगजेब | १७०३ | |
| गणेश पेठ | सखारामबापू बोकील | १७४८ | नंतर गणेशाचे नाव |
| सदाशिव पेठ | सदाशिवराव पेशवे | १६५७ | त्यांचे स्मरणार्थ |
| नारायण पेठ | नारायणराव पेशवे | १७७० | त्यांचे स्मरणार्थ |
| रास्ता पेठ | सरदार रास्ते | १७८० | त्यांचे स्मरणार्थ |
| नाना पेठ | नाना फडणवीस | १७८३ | त्यांचे स्मरणार्थ |
| गंज पेठ | ब्रिटिश सरकारने | १८१८ | नंतर महात्मा फुलेंच्या स्मरणार्थ (हिचेच आत्ताचे नाव महात्मा फुले पेठ असे आहे) |
| नवी पेठ | ब्रिटिश | | सरकारने१८१८नंतर नव्याने वसवलेली असल्याने |

**सोमवार पेठ :** इसवी सन १७७३ मध्ये थोरले बाजीराव पेशव्यांनी नगराच्या पूर्व सीमेवरून होणाऱ्या दळणावळणावर लक्ष ठेवणे सोईचे जावे, या कारणास्तव सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था केली व अनेक गस्ती नाकी बांधलीच; पण त्याचबरोबर जुन्या शाहूपुरा पेठेची नव्याने पुनर्बांधणी करून तिचे 'सोमवार पेठ' असे नवे नामकरणही केले. येथील नागेश्वर मंदिर हे आबा शेलूकर ह्यांनी बांधले आहे.

**मंगळवार पेठ :** औरंगजेब बादशाहाचा मामा शाहिस्तेखान दख्खन मोहिमेवर ९ मे १६६० रोजी पुण्यामध्ये आला, त्या वेळी त्याने लाल महालामध्ये आपला मुक्काम ठोकला आणि त्याच्यासोबत आलेल्या अडीच लाखांच्यावर सैनिकांची व्यवस्था त्याने लाल महालाच्या आजूबाजूच्या असलेल्या मोकळ्या जागेत केली. जवळूनच मुठा नदी वाहत असल्याने पाण्याचीही सोय झाली. तीन वर्षांतच बाजारपेठ बहरली. शाहिस्तेखानाची पेठ म्हणून हिला शास्तापुरा असेही म्हणत असत, अशीही कागदोपत्री नोंद आढळते. छत्रपती शिवाजीमहाराजांनी शाहिस्तेखानाच्या छावणीवर हल्ला करून लाल महालाच्या खिडकीतून शाहिस्तेखान पळून जात असता त्याची बोटे छाटली, त्यामुळे घाबरून जाऊन खान दिल्लीला पळून गेला.

**बुधवार पेठ :** रविवार पेठ चार वर्षांतच भरली, म्हणून नानासाहेब पेशव्यांनी त्याच्या जवळच नवी वसाहत वसविण्याचा निर्णय घेतला व त्या वसाहतीचे 'बुधवार पेठ' असे नामकरणही केले. या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा कापडाचे व्यापारी कापड व्यवसाय करीत असल्याने या भागाला 'कापड गंज' (पेठ) किंवा 'कापड आळी' असेही म्हणत. जवळच एक विठ्ठलाचे मंदिरही होते. त्याच्या समोरच नारायण गावचे काही पासोड्या विकणारे व्यापारी बसत. म्हणून त्या विठ्ठलालाही 'पासोड्या विठोबा' असे म्हटले जाऊ लागले.

**गुरुवार पेठ :** बुधवार आणि रविवार या दोन्ही पेठांमधील वस्ती व गर्दी वाढली, मोठ्या व्यापाऱ्यांनी तर बरीचशी जागा व्यापून टाकली; पण त्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांची फारच गैरसोय होऊ लागली. जवळपासच्या छोट्या-छोट्या गावांतून आपला माल घेऊन येऊन विकणारे बरेच छोटे व्यापारी होते. दिवसभर व्यापार करून दिवेलागणीला परत घरी जाणारे. अशा व्यापाराला मेण बाजार असे म्हणतात. या छोट्या व्यापाऱ्यांना व्यवस्थित जागा मिळावी, या उद्देशाने नानासाहेब पेशव्यांनी ही नवी 'गुरुवार' पेठ वसविली तिथे वेताळाचे एक देऊळही बांधले, त्यामुळे 'वेताळ पेठ' असाही उल्लेख केलेला आढळतो. या गुरुवार पेठेत अठरापगड जातींचे व्यापारी होते. उदा. सोनार, लोहार, जंगम, काची, पेंढारी, छप्परबंद, मोची, तांबोळी इत्यादी.

**शुक्रवार पेठ :** जिवाजीपंत अण्णा खासगीवाले कोतवाल यानी ही पेठ तिसरे पेशवे श्रीमंत बाळाजी बाजीराव यांच्या आदेशावरून वसविली होती. क्षेत्रफळ व लोकसंख्येनुसार ही पेठ इतर सर्व पेठांपेक्षा मोठी होती.

**शनिवार पेठ :** शनिवार पेठ जरी आधीपासूनच अस्तित्वात असली, तरी या पेठेचे महत्त्व वाढले, ते शेवटचे पेशवे दुसरे बाजीराव यांच्या काळातच. (इ.स.१७९६ ते १८१७) त्या काळात या शनिवार पेठेला अनन्यसाधारण महत्त्व येण्याचे कारण म्हणजे पेशव्यांचे अत्यंत जवळचे नातेवाईक, खास मर्जीतले अधिकारी व सरदार आणि इतर दरबारी प्रमुख व्यक्ति यांचे वास्तव्य प्रामुख्याने या पेठेतच होते, हे होय.

**रविवार पेठ :** कसबा पेठ आणि शनिवार पेठ येथील वस्ती वाढत होती आणि जागा अपुरी पडत होती, त्यामुळे थोरले बाजीराव पेशवे यांनी पूर्वीच्या केदार वेशीच्या बाहेर जुन्या मलकापुर पेठेच्या दुतर्फा नव्या पेठेची उभारणी करून तिचे (आदित्यवार) 'रविवार पेठ' असे नामकरण केले. जुन्या केदार वेशीपासून ते पासोड्या विठोबाच्या मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर व्यापाऱ्यांनी बाजारपेठा वसविल्या. शेजारच्या मुहियाबाद पेठेतल्या (बुधवार पेठ) कापड आळी मध्येसुद्धा दुकानांची भाऊगर्दी झाली होतीच, म्हणूनच रविवार पेठ दक्षिणेकडे वाढवून सराफाची दुकाने थाटली गेली. रविवार पेठेच्या दक्षिणेकडील टोकाला सोन्या मारुती आहे. रविवार पेठ म्हणजे श्रीमंत व्यापारी पेठ अशी ओळख आहे.

**कसबा पेठ :** कसबा पेठ ही पुण्यातील सगळ्यात जुनी पेठ आहे. पुण्याचे ग्रामदैवत कसबा गणपती याच ठिकाणी आहे. छत्रपतींचे वडील शहाजीमहाराज यांनी कसबा पेठेत पुण्याच्या दक्षिणेस भव्य लाल महाल बांधला.

**गणेश पेठ :** रविवार पेठेच्या पूर्वेला व गंज पेठेच्या उत्तरेला वसाहत स्थापण्यात आली आणि गणेश पेठ असे नामकरण करण्यात आले. येथे असणाऱ्या डुल्या मारुतीची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे ती अशी-पानिपत संहाराच्या बातम्या ऐकून इथला मारुती डोलू लागला म्हणून याला 'डुल्या मारुती' असे नाव पडले.

**मीठगंज पेठ :** त्या काळी या भागात मोठ्या प्रमाणावर मिठाचा व्यापार, साठवण, विक्री चालायची म्हणून या भागाला 'मीठगंज' पेठ असे नाव पडले. मिठाबरोबरच येथे मोठ्या प्रमाणावर ॲन मालाची गोदामे होती, म्हणून काही काळानंतर 'गंज पेठ' असे नामकरण करण्यात आले. त्या वेळी महात्मा ज्योतिबा फुले येथे राहत असत व आता शासनाने त्याच जागेवर त्यांचे स्मारक केल्याने आता या पेठेचे नाव 'महात्मा फुले पेठ' असे बदलण्यात आले आहे.

**नारायण पेठ :** पानिपतच्या युद्धानंतर पाचवे पेशवे नारायण बाळाजी (मृत्यू १७७३) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ही पेठ वसविण्यात आली.

**घोरपडे पेठ :** सरदार मालोजीराव घोरपडे (१७८१) यांचे स्वतःचे खासगी सैन्यदल होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचा नावानेच ही पेठ वसविली गेली.

**नाना पेठ :** नानासाहेब पेशवे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आणि फक्त धान्य व्यापाऱ्यांसाठी नाना पेठ स्थापन केली गेली व केवळ व्यापारी उद्देशाकरताच ही पेठ वसविली गेली.

**रास्ता पेठ :** पेशव्यांचे एक सरदार आनंदराव लक्ष्मण रास्ते (१७८२) हे पेशव्यांचे घोडदल सांभाळायचे. त्यांच्याच नावे ही पेठ ओळखली जाते.

**भवानी पेठ (टिंबर मार्केट) :** नागझरीच्याही पलीकडे जिथे १६०३ मध्ये औरंगजेबाच्या सैन्याची छावणी होती, त्या जागेवर पुण्याचा विस्तार करावयाचे माधवराव पेशव्यांनी ठरवले. तेथील पेशव्यांचे कारभारी सखाराम भगवंत यांनी मोकळ्या जागेत भवानीदेवीचे मंदिर बाधले. त्यामुळे पुढे ही 'भवानी पेठ' म्हणूनच ओळखली जाऊ लागली.

घाऊक व्यापारी, तेलबिया, लाकूड आणि किराणा-भुसार व्यापारी अशी या पेठेची ओळख आजही कायम आहे. मोकळी जागा भरपूर असल्याने बाहेरून आलेल्या मालाची चढ-उतार व साठवण आणि वाटप याच ठिकाणी होते. या पेठेच्या मध्यभागी सूर्यमुखी सिद्धिविनायक मंदिराच्या जवळच चावडी होती. त्यावर रामोशी पहारेकरी असायचे. शेजारी रामोशी गेट पोलीस चौकी आहे.

**नागेश पेठ :** हिलाच 'न्याहाल' पेठ असेही म्हणत असत. लोकवस्ती वाढली, उद्योगधंदे वाढले, नव्या पेठा स्थापन झाल्या. सात वार, सात पेठा हे समीकरण कधीच मागे पडले. आजकाल नवी शहरेच वसविली जातात.

पण या पेठांमुळे बरेचसे पुणेरीपण टिकविले आहे. काळानुरूप बदल झाले असतील, पण ते पुणे आता राहिलेच नाही म्हणणाऱ्यांनी इथे चक्कर मारलीच पाहिजे.

पुण्याच्या या पेठांचे १८६९ ते १८७२ या दरम्यान रे लाईट या ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून नकाशामापन या शास्त्रशुद्ध पद्धतीनुसार सर्वेक्षण करण्यात आले. कारण तेव्हा पेठा म्हणजेच पुणे आणि पुणे म्हणजेच पेठा होते.

## ऊन सावल्या येतील जातील

फणसळकर

ऊन सावल्या येतील जातील
कोंब जपावे आतील हिरवे
चला दिवाळी आली आहे
ओंजळीत घ्या चार दिवे ।।

पहिला लावा थेट मनातच
तरीच राहील दुसरा तेवत
घरात आणि प्रियजनांच्या
आयुष्यावर प्रकाश बरसत ।।

तिसरा असू दे इथे अंगणी
उजेड आल्या गेल्यांनाही
चौथा ठेवा अशा ठिकाणी
जिथे दिवाळी माहीत नाही ।।

**SAD DEMISE**

(Mother of Panduranga Gurjar)

We deeply regret to inform the sad demise of Smt. Seeta Gurjar aged about 90 years today (2nd Nov 2018) after a short time illness at her residence.

She is survived by 7 sons and 2 daughters, lot of friends and relatives

We at karhada deeply condole the sad demise.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक संघाचे माजी अध्यक्ष

**श्री. जयप्रकाश खांडेकर**

(७६) यांचे ८ डिसेंबर २०१८ रोजी निधन झाले. त्यांच्या धडाडीच्या कार्यामुळे नाशिक संघाचा विकास झाला. त्यांचे कारकिर्दीत संघाकरिता जागा घेतली गेली, नाट्यसंगीत कार्यक्रम घेतले गेले.

श्री. जयप्रकाश खांडेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ आणि सर्व विश्वस्त व सर्व सभासद संघाची भावपूर्ण श्रद्धांजली .


# सप्तशती ज्वेलर्स



डोंबिवलीमध्ये सोन्या-चांदीची सुमारे ५०० दुकाने आहेत, त्यात आपल्या समाजबांधवांपैकी फक्त चारच आहोत. सप्तशती ज्वेलर्स हे त्यापैकी एक...

**कृपया आपले नातेवाईक व मित्रपरिवार यांना आपल्या दुकानाचे नाव जरूर सुचवावे आपल्याला सोने, चांदी, रत्नाप्रित्यर्थ काही माहिती हवी असल्यास कृपया फोन करावा अथवा समक्ष भेटावे. हिरे व नवग्रहाचे खडे पारखण्याचे वैज्ञानिक प्रशिक्षण आम्ही घेतलेले असल्यामुळे रत्नांची खरेदी करताना आमच्या ज्ञानाचा आपणाला अवश्य फायदा होईल.**

**रिकरिंग डिपॉझिट (भिशी) अंतर्गत आणि मर्यादित चेन, पाटल्या, बांगड्या, वेडिंग रिंग व मंगळसूत्र यावर मजुरी आकरली जात नाही. दरमहा किमान रुपये ५०० वा अधिक रक्कम ठेवल्यास दोन वर्षांनंतर चार हप्ते जास्त दिले जातात. जुने सोने व चांदी योग्य भावात विकत घेतो.**

***व्यवसाय करणाऱ्या आपल्या समाजबांधवांना यथायोग्य सहकार्य करण्याची आपली परंपरा आहेच, त्या परंपरेचा आम्ही नम्रपणे आदर करतो.***





दुकान नं. ५०७, तळमजला, बी/३ विंग, कस्तुरी प्लाझा सोसायटी, मानपाडा पथ, डोंबिवली पू. ४२१ ०२०१.

# मिल्क कुकर व राईस कुकर

कुमार माईणकर, ठाणे
मो. : ९८२१४८९४५०

कुकरमध्ये अन्न न करपता शिजवता येते. मग याच तत्त्वाचा अन्य कुठे वापर करता येईल काय, या विचारातून मिल्क कुकरची निर्मिती झाली.

दूध तापवताना जरा दुर्लक्ष झाले की, ते उतू जाते. दूध उतू जाते; कारण दुधामधील स्निग्ध पदार्थाचा एकत्रित थर म्हणजे साय ही आतील वाफ बाहेर पडण्याला प्रतिबंध करत असते. वाफेबरोबरच साय वरवर जाते व दूध उतू जाते. हे टाळण्याचा प्रयत्न मिल्क कुकरमध्ये यशस्वीरीत्या केला आहे. एखाद्या थर्मासप्रमाणेच मध्यभागी पोकळी असलेली दोन भांडी एकमेकांना पूर्ण सांधलेली असतात. मात्र या पोकळीतून वाफ बाहेर पडण्यासाठी एक छोटे भोक ठेवलेले असते. या भोकाला बसवलेल्या छोट्या टोपणावर एक शिट्टी फिरकीने लावता येते वा काढता येते.

कुकरचे तत्त्व म्हणजे आतील भांड्यातील पदार्थाला पाण्याच्या उत्कलन बिंदू एवढीच उष्णता मिळत राहावी, हे या तत्त्वानुसार प्रथम पोकळीमध्ये एक भांडभर पाणी घातले जाते व टोपणावर शिट्टी बसवतात.



मग यातील भांड्यात दूध घालून कुकर गॅसवर ठेवला जातो. बाह्य भांडे तापते, पोकळीतील पाणी तापते; या दोन्हीतून दुधाला उष्णता पोहोचवली जाते. ज्या क्षणी दुधाचे तापमान शंभर डिग्री सेंटिग्रेड होते, त्या क्षणी पोकळीतील पाण्याची वाफ होऊ लागते. ही वाफ कोंडली जाऊन शिट्टीवाटे बाहेर पडते. त्यानंतर जी उष्णता कुकरला दिली जाते, ती सर्वच्या सर्व पोकळीतील पाण्याची वाफ करण्यासाठीच वापरली जाऊन आतील दुधावर त्याचा परिणाम होतच नाही. म्हणजेच दुधाला उकळी फुटत नाही व ते उतू जात नाही. अर्थातच जोरदार शिट्टीचा आवाज ऐकून आपण वेळेत गॅस बंद करावा, ही साधी अपेक्षा येथे आहेच. असा हा मिल्क कुकर अर्धा लिटर, एक लिटर व दोन लिटर अशा निरनिराळ्या आकारांत मिळतो. याचे सर्व भाग ॲल्युमिनियम व हिंदालियमचे केलेले असतात. यामध्येही मुख्य म्हणजे, दूध वाया जात नाही व ऊर्जेची बचत निश्चित होते. तांदूळ शिजवताना मंद शिजले, तर भाताची चव वेगळी लागते, हे कधी अनुभवले आहे काय? चुलीवर शिजवलेला भात, गॅसवरचा भात, प्रेशर कुकरमधील भात यांच्या चवींत जाणकार मंडळींना नेहमीच फरक आढळला आहे. एवढेच काय, पण सोलर कुकरमधील भातही वेगळाच लागतो. मग उत्तम भात कसा करावयाचा, तो किती वेळ शिजत राहिला, किती तापमानाला शिजवला व शिजवल्यानंतर गार होऊ न देता गरमच राहिला, तर? या संशोधनाचे फलित म्हणजे 'राईस कुकर' होय.

भात शिजवल्यावर गार होता कामा नये, हे पहिले महत्त्वाचे. नंतरचा भाग म्हणजे तो सावकाश व नैसर्गिक वेळात शिजावा, जीवनसत्त्वे कायम राहावीत. या सर्व गोष्टींची काळजी राईस कुकर या विद्युत ऊर्जेवर चालणाऱ्या उपकरणात घेतली जाते. या उपकरणातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे थर्मोस्टॅट. ठरावीक तापमान साध्य झाले की, उपकरण आपोआप बंद होते व कमी तापमानाला पुन्हा सुरू होते. यामुळे भात शिजणे व आपण येऊन कुकर उघडेपर्यंत थंड न होणे



या गोष्टी तापमान नेमके राखले जाऊन साध्य होतात. या कुकरमध्ये दोन टप्पे असतात. प्रथम ठरावीक वेळात ठरावीक पद्धतीत तांदूळ शिजतात, हा पहिला टप्पा. यानंतर मात्र हा शिजवलेला भात खाण्याजोगत्या तापमानाला गरम राखला जातो, हा दुसरा टप्पा.

चवीने भात खाणारे, भाताचे विविध प्रकार गरमागरम खायला आवडणारे असे जे शौकीन आहेत, त्यांच्यासाठी राईस कुकर ही एक मोठीच उपयुक्त वस्तू आहे, हे

## अभिनंदन

।।श्री।।

श्री हरिकीर्तनोत्तेजक सभा, नारद मंदिर, पुणे या कीर्तन संस्थेच्या वार्षिकोत्सवानिमित्त प्रतिवर्षी ज्येष्ठ कीर्तनकार, युवा कीर्तनकार, साथीदार यांचा गौरव करण्यात येतो. यंदा हा ***'युवा कीर्तनकार पुरस्कार'*** **चि. स्वानंद विनय आळवणी** यांना जाहीर झाला आहे. त्यांचे याच संस्थेत



कीर्तन शिक्षण झाले असून त्यानंतर 'कीर्तन विशारद' ही पदवी प्राप्त केली आहे. दि. २७ जानेवारी २०१९ रोजी श्री. नारद मंदिर येथे पुरस्कार वितरण समारंभ सायंकाळी सहा वाजता आयोजित केला आहे.

# उरका-उरकी न करण्यासारख्या दोन गोष्टी : १. स्नान २. जेवण

श्रीहरी गुणे, पुणे
मो. : ८७८८७ २२८१३

आपण बऱ्याच वेळा म्हणतो 'अंघोळ, जेवण उरकून येतो'. आई-वडील मुलांना म्हणतात- 'अंघोळ उरकून घे रे.' स्त्रिया एकमेकांशी बोलताना म्हणतात जेवणं उरकली का?

खरं तर जेवण व स्नान ह्या दोन गोष्टी आरोग्याच्या दृष्टिकोनामधून मुळीच उरकून झटपट करून टाकण्याच्या नाहीत (उरकण्यासाठी आपल्यासाठी अनेक गोष्टी आहेत- टीव्ही पाहणे, मोबाईलवर गप्पा इत्यादी). वरील दोन्ही गोष्टी ह्या उरकण्यासारख्या नसून त्या व्यवस्थितपणे भरपूर वेळ, काळजीपूर्वक करावयाच्या गोष्टी आहेत.

आपण काम, कष्ट, वेळ खर्च करून पैसे मिळवत असतो. त्यासाठी १०/ १२ तास खर्च करतो, ते पोट आहे म्हणून. मग ते काय घाई-गडबडीत ५/१० मिनिटांत भरून उरकावयाचे त्यासाठी नियमानेसुद्धा अर्ध्या तासाची जेवणाची सुट्टी दिलेली असतं तेव्हा हे ठरावीक वेळेला सावकाश, आस्वाद घेत, आनंदाने गप्पा-गोष्टी करीत आणि चित्त जेवणाकडे ठेवून (टीव्ही बघत नाही) केले पाहिजे.

तोच प्रकार स्नानाचा आहे. स्नान करतात संगीत असले पाहिजे. स्वतः बाथरूम संगीत गात वा ऐकत केले पाहिजे. आता स्नानाचेही ५/१० प्रकार आपणास 'आरोग्य धाम' सारख्या संस्थांमध्ये पाहावयास मिळतात. सर्वसाधारणपणे ऋतू अनुसरून स्नान करावे. थंडीमध्ये गरम पाण्याने व उन्हाळ्यामध्ये थंड पाण्याने करण्याची ही गोष्ट आहे. स्नान करणे म्हणजे नुसते सुवासिक साबण, शाम्पू तत्सम साधनांनी स्वच्छ करणे नव्हे; तर तुमच्या शरीरातील नस-नस, आतील व बाहेरील तापमान एक होईपर्यंत म्हणजे सुमारे १ ५/ २० मिनिटे करून नस आणि नस मोकळी होऊन कफ, वात, पित्त बाहेर पडून रक्तप्रवाह सुधारला पाहिजे. अंग हलके होऊन जडत्व कमी व्हायला पाहिजे. याप्रमाणे जर वरील दोन गोष्टी केल्या तरच तुम्हाला उत्साह, चैतन्य येईल. म्हणून वरील दोन गोष्टी उरकू नये.


।। श्री आर्यादुर्गा प्रसन्न ।।

गणेश गुर्जर परिवारातर्फे कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास

हार्दिक शुभेच्छा!



व्यावसायिक प्रतिष्ठान

SDS ENTERPRISES

'Sarthak', 4/5/5 A, Erandwane, Patwardhan Sahakari
Grih Rachana Sanstha Mydt, Pune 411 004.

Solution for all Computer Needs

# रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ

रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघाचा गुणवत्ता पारितोषिक आणि पुरस्कार प्रदान समारंभ रविवार, दि.१६/१२/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता संघाच्या राणी लक्ष्मीबाई सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. सौ. चित्रा कशाळकर – निवृत्त प्राध्यापिका पद्माराजे गर्ल्स हाय. ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर यांची त्याचप्रमाणे कोल्हापूर कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे माजी उपाध्यक्ष श्री. मिलिंद पावनगडकरसाहेब यांची प्रमुख उपस्थिती होती.

दीपप्रज्वलन व वेदमंत्रपठणाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. संघाचे अध्यक्ष श्री. माधव भास्कर हिर्लेकर यांनी प्रास्ताविकात प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यानंतर प्रमुख पुरस्कारविजेत्यांना मा. सौ. चित्रा कशाळकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

१. **दर्पण पुरस्कार–** दर्पण पुरस्कार कै. बाळशास्त्री जांभेकर (दर्पणकार) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ श्री. शि. स. देसाई –देवगड यांच्या देणगीतून दिला जातो. यंदा हा पुरस्कार दैनिक सकाळचे श्री. मकरंद पटवर्धन यांना देण्यात झाला. श्री. पटवर्धन गेली अनेक वर्षे रत्नागिरी जिल्हा मराठी पत्रकार संघामध्ये तसेच रत्नागिरी जिल्हा फोटो व्हिडिओग्राफर संघटनेमध्ये कार्यरत आहेत.

२. **आदर्श पौरोहित्य पुरस्कार** – सदर पुरस्कार कै. द. दि. पाध्ये यांचे स्मरणार्थ श्री. ना. द. पाध्ये यांनी दिलेल्या देणगीतून दिला जातो. हा पुरस्कार दापोली येथील श्री. रवींद्र रामदास पटवर्धन यांना देण्यात आला. श्री. पटवर्धन यांनी पटवर्धन पाठशाळा, पुणे येथे याज्ञिकीचे शिक्षण घेतले आहे.

३. **आचार्य नारळकर पुरस्कार** – हा पुरस्कार आचार्य नानासाहेब नारळकर यांचे स्मरणार्थ डॉ श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांच्यामार्फत दिला जातो. या वर्षी हा पुरस्कार सौ. मुग्धा महेंद्र पाध्ये यांना देण्यात आला. कला, हिंदी व समाजशास्त्र हे सौ. पाध्ये यांचे अध्यापनाचे विषय आहेत. नाटे, ता. राजापूर येथे त्या अध्यापन करतात.

४. **आदर्श कीर्तनकार पुरस्कार :** हा पुरस्कार कै. ब्रह्मचारी ब्रह्मीभूत गंगाधर मल्हार शेंबेकर यांचे स्मरणार्थ मल्हार विष्णू शेंबेकर व कुटुंबीय यांनी ठेवलेल्या ठेवीतून दिला जातो. या वर्षी हा पुरस्कार पुणे येथील ह.भ.प. श्री. पुंडलिक विठ्ठल हळबे यांना प्रदान करण्यात ज्ञाला. योगीश्वर याज्ञवल्क्य हा त्यांचा आवडीचा आख्यानाचा विषय 'पूर्वरंग' व 'उत्तररंग' ही पुस्तके लिहिली आहेत. त्याप्रमाणे 'सदाचार' हे पुस्तक लिहून आचरण कसे असावे, याबाबत मार्गदर्शन केले आहे.

५. **धन्वंतरी पुरस्कार :** सदर पुरस्कार डॉ. शरद वि. प्रभुदेसाई यांनी ठेवलेल्या ठेवीतून दिला जातो. या वर्षी हा पुरस्कार कुडाळ येथील वैद्य सुविनय विनायक दामले यांना प्रदान करण्या आला. वैद्य दामले ज्यांना आर्थिक स्वरूपात शुल्क देता येत नाही त्यांच्याकडून वस्तूरूपात– जसे की कोकम, केरसुणी, तांदूळ इ. स्वरूपात शुल्क आकारतात. त्यांच्या या वस्तुविनय पद्धतीची लिम्का बुकमध्ये दखल घेतली गेली.

६. **उद्योजक पुरस्कार :** कै. श्रीधर श्रीराम ठाकूरदेसाई यांचे स्मरणार्थ उभरत्या उद्योजकाला पुरस्कार देण्यासाठी श्रीमती सीमा ठाकूरदेसाई यांनी ठेव ठेवली आहे. या ठेवीतून या वर्षी हा पुरस्कार श्री. योगेश माधव सरपोतदार यांना देण्यात आला. श्री. सरपोतदार यांची आंजणारी, ता. लांजा येथे महालक्ष्मी फूड प्रॉडक्ट्स ही कंपनी आहे.

सत्कारमूर्तींना रोख रक्कम, पुस्तकख श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सर्व पुरस्कारविजेत्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यानंतर संघातर्फे विशेष कामगिरी करणाऱ्या पुढील ज्ञातिबांधवाना गौरवण्यात आले–

१ श्री. अभयराज श्रीकृष्ण जोशी – पी. एच.डी. कानपूर – जैविक तंत्रज्ञान

२ श्री. सुधीर पांडुरंग नवाथे – पी. एच. डी. बनारस – वनस्पती रोग शास्त्र

३ श्री. संजय वसंत नवाथे – लांजा पंचायत समिती अध्यक्ष

४ श्री. अनिकेत उदय हर्षे – नेवरी शिक्षण संस्था, अध्यक्ष

५ श्री. मिलिंद चंद्रकांत आठल्ये – व्यवस्थापक – जनता सह. बँक, लांजा. सर्वोत्कृष्ट शाखा दुसरा क्रमांक

६ श्री. सुहास श्रीराम ठाकूरदेसाई – पर्यटन मित्र – राज्य शासनाचा पुरस्कार

७ कु. सिद्धी सतीश बोंद्रे - संगीत नाटक, अभिनय, गायन पुरस्कार

८ श्री. ओंकार यशवंत पेंढारकर - विज्ञान संशोधक पुरस्कार

९ श्री. आदित्य आनंद पंडित - लिटल व्हॉइस ऑफ रत्नागिरी २०१८ चा विजेता

१० श्री. केदार दिलीप टिकेकर - रोहन सावंत स्मृती तबलावादन स्पर्धेचा विजेता.

गौरवमूर्तींना पुस्तक, पुष्पगुच्छ, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

त्याचप्रमाणे विवाहाला ५० वर्षे पूर्ण झालेल्या ज्ञातीतील पुढील जोडप्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन अभीष्टचिंतन करण्यात आले.

१. जी. एम. डब्ल्यू. देसाई व सौ. सरोज एम. देसाई - रत्नागिरी

२. श्री. श्रीराम मुळ्ये व सौ. शुभदा श्रीराम मुळ्ये - रत्नागिरी

३. श्री. रामचंद्र द. पाध्ये व सौ. लीला रामचंद्र पाध्ये - भू, ता. राजापूर

४. श्री. धुंडिराज आंबर्डेकर व सौ. पुष्पलता धुंडिराज आंबर्डेकर- रत्नागिरी

५. श्री. मनोहर जयराम देसाई व सौ. पुष्पगंधा मनोहर देसाई - धुंदरे, ता. लांजा

६. श्री. अच्युतराव आठल्ये व सौ. अर्चना अच्युतराव आठल्ये - रत्नागिरी

त्यानंतर शिष्यवृत्तीधारक, दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थी व पदवीधारक विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व पुष्प देऊन गौरव करण्यात आला.

मा. सौ. चित्रा कशाळकर यांनी मनोगत व्यक्त करताना ''लहान मुलांची कल्पनाशक्ती अचाट असते. त्यामुळेच ती क्षितिजापलीकडे पाहत असतात. आपणही क्षितिजापलीकडे पाहण्याची वृत्ती अंगीकारली पाहिजे'' असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. शर्वाणी ढवळे हिने केले. सेक्रेटरी सौ. शिल्पा पळसुलेदेसाई यांनी आभारप्रदर्शन केले

यानंतर वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला सुमारे २७० सभासद उपस्थित होते. या सर्वांनी अल्पोपाहार व कॉफीचा आस्वाद घेतला. कार्यक्रम अतिशय उत्साही व प्रसन्न वातावरणात संपन्न झाला.


माधव भास्कर हिर्लेकर
अध्यक्ष,
रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ मर्यादित, रत्नागिरी.



जी. व्ही. गणपत्ये
केमोक्रॅट्स सेल्स्
फायबरग्लास रॉ मटेरिअल,
इपॉक्सी रेझिन्स, पॉलियुरेथिन रेझिन्स इपॉक्सीपुटीज (एम-सील)
लॅमिनेशन मटेरिअल, प्लायवूड बोर्ड्स
मिळण्याचे एकमेव ठिकाण.
जोगेश्वरी मंदिरासमोरील गल्ली, वाघ चेंबर्स, ६४५, बुधवार पेठ,
सकाळ ऑफिसजवळ, पुणे - ४११ ००२
ऑफिस (०२०) २४४५२११०, २४४५९८३४ मो. ९८२२० २४२१०

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर
# ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

दि. ९ डिसेंबर २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वा. मंगलधाम, ब्राह्मण सभा करवीर येथे संपन्न झाली. सभेला सभासदांची उपस्थिती लक्षणीय होती. सभेमध्ये सभासदांचे स्वागत महिला प्रतिनिधी सौ. अश्विनी तांबे यांनी केले. त्यानंतर संघाचे दिवगंत सभासद व इतर मान्यवरांना श्रद्धांजली वाहून सभेस सुरुवात झाली.

प्र. अध्यक्ष श्री. आनंद खंडकर यांनी ३० व्या वार्षिक सभेस सुरुवात होत आहे असे जाहिर केले. त्यानंतर प्रथेप्रमाणे सभेपुढील विषय क्रमानुसार घ्यावेत असे श्री. धर्मराज पंडित यांना सुचवले व सभेची सूत्रे सेक्रेटरीकडे दिली.

सेक्रेटरी धर्मराज पंडित यांनी प्रथमतः सभेची नोटीस वाचून दाखविली व विषय पत्रिकेवरील विषयांना मंजुरी द्यावी, असे सभासदांना सुचवले. प्रत्येक विषयाचे वाचन करून सभासदांच्या काही शंका आहेत का विचारून विषयास मंजुरी घेतली. यामध्ये सन २०१७-१८ खर्चास मंजुरी तसेच २०१८-१९ च्या अंदाजपत्रकास मंजुरी घेण्यात आली. यामध्ये संघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ संचालक यांनी ॲडव्हान्स भाडे याचा खुलासा विचारला त्यांचे




सेक्रेटरी धर्मराज पंडित यांनी शंकानिरासन केले. संघाचे ज्येष्ठ सभासद श्री. अरविंद दीक्षित यांनी त्यातील शंका विचारल्या व त्याचे निरसन करण्यात आले आणि त्या दोन्ही विषयांस मंजुरी घेतली.

विषय क्रमांक ५ अंतर्गत हिशोब तपासनीस नेमण्यबाबत विषय मांडण्यात आला. त्यास उपस्थित सभासदांनी कार्यकारिणीला अधिकार देण्यात आला. ऐनवेळी कोणताही विषय न आल्याने सभासदांच्या कोणत्याही शंका नसल्याने सभा संपल्याचे सेक्रेटरी धर्मराज पंडित यांनी जाहीर केले. सभेला कार्यकारी मंडळातील कोषाध्यक्ष- श्री. अनिरुद्ध जावडेकर, सहकार्यवाहक श्री. अजित कारखानीस, महाकोषाध्यक्ष- श्री. नितीन जोशी, सदस्य- श्री. रघुनाथ धुपकर, महिला सदस्य- सौ. अश्विनी तांबे, अर्थनियोजन समिती- श्री. रामचंद्र टोपकर उपस्थित होते.

त्यानंतर उपस्थित सभासद ब्राह्मण सभा करवीर, केटरर्स श्री. उमेश कशाळकर आदींचे अभार श्री. मिलिंद पावनगडकर यांनी मानले सभासदांनी चहा-पान घेतल्याशिवाय जाऊ नये, असे आवाहन केले व सभा संपन्न झाली.

# राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ, सोलापूर
# अहवाल दि. ८.१२.२०१८

राणी लक्ष्मीबाई महिला मंडळाची डिसेंबर महिन्यातील बैठक सौ. मधुवंती नाफडे यांच्या घरी पार पडली. या बैठकीस सौ. अंजली माईणकर, सौ. तृप्ती माईणकर, सौ. सारिका आठल्ये, सौ. अनुजा आठल्ये, सौ. नाफडे, सौ. गोवित्रीकर, श्रीमती करकरे, श्रीमती भाटवडेकर महिला उपस्थित होत्या. गीतेतील १२ व्या अध्यायाने बैठकीस सुरुवात झाली. नंतर सौ. नाफडे यांनी 'चंद्र, तारे, चांदण्या' यावर आधारित हिंदी व मराठी चित्रपटातील गाणी १० मिनिटांत लिहून काढणे अशी स्पर्धा घेतली. या स्पर्धेत सौ. सारिका आठल्ये व श्रीमती भाटवडेकर यांचा अनुक्रमे पहिला व दुसरा नंबर आला. त्यानंतर प्रत्येकीने आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण सांगितला. अल्पोपाहाराने सभेची सांगता झाली.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ यांच्या आदेशानुसार सर्व सदस्य संघांनी १९ नोव्हेंबर हा झाशीच्या राणीचा जन्मदिवस हा 'कऱ्हाडे गौरवदिन' म्हणून साजरा करण्याचे ठरले. त्यानुसार मुलींच्या शाळेत क्रीडा

स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्याचे ठरवले त्याप्रमाणे सोलापुरातील संघाने व झाशीची राणी लक्ष्मीबाई महिला मंडळाने 'सेवासदन' मुलींच्या प्रशालेत या स्पर्धा घेण्याचे आयोजन केले. त्याकरिता दि. ३ डिसेंबर २०१८ रोजी सौ. अंजली माईणकर व सौ. तृप्ती माईणकर यांनी प्रशालेतील सेक्रेटरी श्री. केदार केसकर व उपमुख्याध्यापक श्री. राठोड यांची भेट घेतली व वरील स्पर्धा घेण्याचे निश्चित केले.

वरील भेटीत ठरलेल्या गोष्टी–

१) इ. ५ वी व ६ वी– प्रत्येकी २० बक्षिसे (शाळेत झालेल्या क्रिडास्पर्धेतील विजेत्या)

२) इ. ७ वी – २ बक्षिसे व १ उत्तेजनार्थ बक्षीस (निबंध स्पर्धा – राणी लक्ष्मीबाई जीवनचरित्र)

शाळेने सहकार्य केल्याबद्दल शाळेला झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे तैलचित्र भेट देण्याचे ठरले.

क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांची नावे व निबंध दि. २४ डिसेंबरपर्यंत गोळा करण्याचे ठरले.

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे शारदीय संमेलन दि.२८/१०/२०१८

एखादी नवी गोष्ट सुरू करण्यापेक्षा सुरू असलेली गोष्ट काही कारणांनी बंद पडली तर ती परत सुरू करताना येणारा मनस्वी अनुभव नुकताच कल्याणनगर कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनी घेतला. निमित होते कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाच्या शारदीय संमेलनाचे. शारदीय संमेलनाची यशस्विता ही सभासदांच्या उपस्थितीवर अवलंबून असते, हे लक्षात घेऊन यंदा परत एकदा काही वर्षांपासून सुरू असलेला घरोघरी कार्यक्रमाची निमंत्रणे देण्याचा कार्यक्रम सभासदांनी हाती घेतला व या योजनेचा दृष्य स्वरूपात लाभ म्हणजे अपेक्षित असलेली सभासदांची उपस्थिती. त्यांची नोंद आपल्या भाषणात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. सुहास अ. पंडित व संस्थेचे सरकार्यवाह श्री. नितीन स. शेंबेकर यांनी आपल्या प्रास्तविकातून घेऊन सभासदांचे मनोधैर्य वाढवले.

कार्यक्रमाची सुरुवात २८ ऑक्टो. २०१८ रोजी संध्याकाळी ५.०० वा. पंडितवाडी येथे संस्थेच्या अध्यक्षांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने झाली. त्या वेळी संस्थेचे कार्यवाह श्री. नितीन स. शेंबेकर यांच्यासह नगरप्रमुख श्री. श्रीधर देवस्थळी हे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात माननीय कार्यवाहांनी संस्थेच्या प्रगतीची, वाटचालीची व उपक्रमांची माहिती देऊन पुढील दोन वर्षांनंतर येत असलेल्या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाबाबत समाजबांधवांना माहिती दिली. नंतर मध्यंतराचे वेळेस कोजागरीचा प्रसाद म्हणून चालत आलेल्या मधुर व सुवासिक मसाला दुधाच्या प्रसादानंतर उत्तरार्धाचा कार्यक्रम सुरू झाला. या वेळी कल्याण नगर समितीतर्फे प्रसिद्ध गायक श्री. वि. र. गोडे यांचा 'अंतरीच्या नाना कळा' हा संगीत नकलांचा कार्यक्रम ठेवला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. श्रीधर देवस्थळी नगरप्रमुख यांनी श्री. वि. र. गोडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला, तसेच त्यांच्याबरोबर असलेल्या सहकाऱ्याचासुद्धा सत्कार करण्यात आला.

या संगीत कार्यक्रमात श्री. वि. र. गोडे यांनी जुन्या व नामांकित अशा गायकांच्या नकला व त्याअच्याच आवाजात त्यांची गायनशैली दाखवून सभासदांनी पूर्वीच्या गानविश्वात नेले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या शिक्षण विभाग-प्रमुख सौ. मीनाक्षी प. काळेले. यांनी अत्यंत बहारदारपणे व उत्स्फूर्तपणे केले. आभार प्रदर्शनाचे काम कल्याणनगर कार्यवाह श्री. रवींद्र ओझे यांनी केले.


कार्यक्रमानंतर श्रीखंड पुरीच्या प्रेमळ भोजनाने परत एकदा अशाच कार्यक्रमांची गरज व्यक्त करीत सर्व सभासदांनी संस्थेच्या कार्यक्रमास मनमोकळी दाद दिली आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता.

**सांस्कृतिक समिती–कार्यवाह**

श्री. परशुराम काळेले

## माझी फजिती

मी शाळेत असताना अमचेकडे एक कुटुंब आले होते. ते आंब्यांचे दिवस होते व घरच्या अंगणात आढी धरुन लावली होती. आंबे पिकल्याचा वर त्याचा वास येऊ लागला ते सांगाण्यासाठी मी काकींच्या घरी गेले. दुर्दैवाने त्या अंध होत्या. त्यांना विचारल्यावर त्या म्हणाल्या हे कुटुंब जाऊ देत मग काढ. ते कुटुंब तिथेच होते. मला काकीचे बोलणे ऐकून व त्या कुटुंबाचा चेहरा पाहून माझी मला लाज वाटली.



यथावकाश ते कुटुंब गेले पण मला तो प्रसंग आठवून आजही हसू येते व माझी फजिती आठवते.

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

### दिवाळी पहाट

दि. ७/११/२०१८

बुधवार, दि. ०७ नोव्हेंबर २०१८ रोजी लक्ष्मीपूजनाच्या सुप्रभाती संस्थेतर्फे संस्थेच्या कार्यालयात 'दिवाळी पहाट'चे आयोजन करण्यात आले. जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून आधुनिक वाल्मीकी, शब्दप्रभू कविवर्य व पटकथाकार ग.दि.मा. यांच्या कवितांचा स्वरतीर्थ बाबूजी ऊर्फ स्व. सुधीर फडके यांनी स्वरबद्ध केलेला ठेवा तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'प्रतिभेचा मळा' हा कार्यक्रम आयोजित केला होता




तोरण समाधानाचे लावता दारी ।
होईल दिवाळी आनंदे साजरी ।
फटाके उडवू हास्यविनोदाचे ।
चिवडा, लाडू हे मधुर वाणीचे ।।
उत्तम विचारांचे आदान-प्रदान ।
हेच दिवाळीचे खरे समाधान।।

अशा शब्दांत व कऱ्हाडे ब्राह्मण बिझिनेस फोरमने पुरस्कृत केलेल्या चिवडा, लाडू, चकलीने सर्व रसिकांचे स्वागत करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. सुहास म. पंडित व इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते गणेशपूजन व द्वीपप्रज्वलन करून गणेशस्तवनाने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यानंतर 'ओम इव्हेंट्स' चे सर्वेसर्वा श्री. दुर्गाराज जोशी व त्यांच्या कलाकार चमूने 'प्रतिभेचा मळा' हा ग. दि.मा. व बाबूजी यांच्या अजरामर गीतांचा सुरेल प्रवास- ज्योतीने तेजाची आरती असा हा स्वर सोहळा सादर करत श्रोत्यांना स्वर वर्षावाने चिंब भिजवून तृप्त केले.

या कार्यक्रमाला श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. पूवार्धातील कार्यक्रमाचे सूत्र-संचालन सौ. माधुरी येल्लापूरकर यांनी केले.

**डोंबिवली पूर्व नगर कार्यकारिणी सदस्य**

**सौ. माधुरी येल्लापूरकर**

### वैद्यकीय कार्यक्रम

संस्थेच्या आरोग्य सामितीतर्फे समाजमंदिर हॉल, टिळकनगर, डोंबिवली (पू) येथे दि. २९/०९ /२०१८ रोजी सकाळी ९ ते दु. १ पर्यंत किडनी विकार, मधुमेह, पोटाचे विकार तसेच सौंदर्याविषयी तपासणी शिबिर व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. यामध्ये डॉ. दिनेश महाजन (किडनी विकार तज्ज्ञ व मधुमेह), डॉ. शरद गुरव (पोटाचे विकार व शस्त्रक्रिया) आणि डॉ. सौ. स्वाती गुरव (त्वचारोग व सौंदर्याविषयी) यांनी मार्गदर्शन व प्रोजेक्टरवर माहितीही दृक्श्राव्य माध्यम) दिली आणि नंतर तपासणीसुद्धा केली.

### रक्तदान शिबिर

संस्थेच्या आरोग्य सामितीतर्फे व वामनराव ओक रक्तपेढीतर्फे दर वर्षीप्रमाणे या वर्षीही समाजमंदिर हॉल, टिळकनगर, डोंबिवली(पू) येथे दि. ०२/१०/१८ रोजी सकाळी ९ ते दु. १ पर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २४ रक्त पिशव्या जमा झाल्या. तसेच कऱ्हाडे ब्राह्मण सेवा




मंडळ, डोंबिवली यांच्या अंबरनाथ नगर कार्यकारिणीतर्फे व टाटा हॉस्पिटलतर्फे दर तीन महिल्यांनी रक्तदान शिबिर आयोजण्यात येते. आतापर्यंत एप्रिल, जुलै, नोव्हेंबर २०१८ मध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ७३ बाटल्या रक्त जमा झाले

**डॉ. अक्षय वि. कानेटकर**

**कार्यवाह, आरोग्य समिती**

******

### आरोग्यजागृतीविषयी व्याख्यान व तपासणी शिबिर

अनिल नेत्र व अनिल कर्करोग हॉस्पिटल व कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८/११/१८ रोजी सकाळी १० ते १ यादरम्यान समाजमंदिर हॉल, डोंबिवली (पू) येथे आरोग्यजागृतीविषयी व्याख्यान व तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये

१) डॉ. सौ. अनघा हेरूर- नेत्रतज्ज्ञ यांचा 'असेल दृष्टी तर पाहू सृष्टी'

२) डॉ. अंकिता कुलकर्णी- बालनेत्रतज्ज्ञ यांचा 'मुलांमधील दृष्टिदोष व घ्यावयाची काळजी'

३) डॉ. अनिल हेरूर- कर्करोगतज्ज्ञ यांचा 'लवकर निदान- देई जीवदान'

या विषयांवर व्याख्याने झाली. या सर्व कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद होता. त्या वेळी ५५ जणांची नेत्रतपासणी व १२ जणांची मेमोग्राफी तपासणी करण्यात आली.

**डॉ. अभय वि. कानेटकर**

**कार्यवाह, आरोग्य समिती**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नागपूर

### सौ. शुभांगीताई भडभडेंना प्रथम कऱ्हाडे ब्राह्मण समाजभूषण पुरस्कार

संघातर्फे दर वर्षी साजरा होणाऱ्या कोजागरी उत्सवासोबतच यंदा प्रथमतः 'कऱ्हाडे ब्राह्मण समाजभुषण पुरस्कार' समारंभाचे आयोजन करण्यात आले. यंदाच्या पहिल्या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या सुप्रसिद्ध लेखिका, राष्ट्रीय चरित्र उपन्यासकार व नाटककार सौ. शुभांगीताई भडभडे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्राचार्य अरविंद खांडेकर ह्यांनी अध्यक्ष आनंद पराडकरांच्या उपस्थितीत सौ. शुभांगीताई भडभडे ह्यांचा शाल, श्रीफळ, मानपत्र व रु. ११,१११/- देऊन सत्कार केला.

दीपप्रज्वलानानंतर संघाचे अध्यक्ष श्री. आनंद पराडकर ह्यांनी आपल्या प्रास्तविकात संघ राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती सादर करून समाजभूषण पुरस्कार हा स्वातंत्र्य-संग्राम सैनिक कै. विनायक यशवंत पराडकर, कै. प्रमिला विनायक पराडकर त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्राप्त झालेल्या रु. २,२५,००० च्या देणगीपासून मिळणाऱ्या व्याजातून ह्या वर्षापासून दर वर्षी कोजागरी उत्सवात एका ज्ञातिबांधवाला देण्यात येणार असल्याचे जाहीर केले.




सत्काराला उत्तर देताना सौ. भडभडे ताईंनी प्रशंसा करुन संघाने दिलेली प्रथम समाजभूषण पुरस्कारांची रक्कम ज्ञातिबांधवांच्या मुला-मुलींना शिष्यवृत्ती / बक्षिसे देण्यासाठी परत करीत असल्याचे टाळ्यांच्या कडकडाटात जाहीर केले.

संघातर्फे दर वर्षीप्रमाणे वार्षिक परीक्षेत उज्ज्वल यश प्राप्त केलेले विद्यार्थी/ विद्यार्थिनींना रु. १५० ते रु. ११११ ची रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यंदाच्या शालांत परीक्षेत उज्ज्वल यश प्राप्त केलेला चि. देवांग खेर ह्याने ८ पारितोषिके व उच्च शालांत परीक्षेत उज्ज्वल यश प्राप्त केलेला चि. जतीन पंडित ह्यानेसुद्धा ८ पारितोषिके प्राप्त केली. एकूण रु. १३००० ची रोख बक्षिसे देण्यात आली.

प्रमुख अतिथी प्राचार्य अरविंद खांडेकरांनी पारितोषिके प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संघ समाजबांधवासाठी करीत असलेल्या कार्याचा गौरव करून समाजबांधवांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

सचिव श्री. श्रीरंग माईणकर ह्यांनी आभारप्रदर्शन केल्यावर कु. वल्लरी नविडेकर व चमूने संगीत सादर केले. समारंभाची सांगता स्वरुची भोजन व दुधप्राशनाने झाली.

**अध्यक्ष,**

**आनंद पराडकर**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या अध्यक्ष पदी श्री.आनंद खंडकर व उपाध्यक्ष पदी सौ. शारदाताई लुकतुके यांची एकमताने आज निवड झाली. त्यांचे अभिनंदन तसेच नूतन महिला संचालक म्हणून सौ. विनिता ताई आंबेकर यांचीही एकमताने निवड झाली. त्यांचेही अभिनंदन. नूतन पदाधिकारी खालील प्रमाणे.

१) धर्मराज पंडित - कार्यवाह

२) अजित कारखानीस - सहकार्यवाह

३) अनिरुद्ध जावडेकर - कोषाध्यक्ष

४) रघुनाथ धुपकर - सहकोषाध्यक्ष

५) नितेश जोशी - सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख

६) मिलिंद पावनगडकर - सदस्य

७) स्मिता दीक्षित - सदस्या

८) सौ अ. र. तांबे - सदस्या

सर्वांचे अभिनंदन.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड

दिनांक ६ नोव्हेंबर २०१८ रोजी सकाळी दिवाळी पहाटचा 'देवगंधर्व ते आनंदगंधर्व- सूर गंधर्वांचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाची संकल्पना, मुलुंडच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्यवाह श्री. श्रीपाद सप्रे यांची होती. मुलुंड कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या सन्माननीय सभासद सौ. वीणाताई प्रदीप नाटेकर (संगीतभूषण पंडित राम मराठे यांची कन्या) यांनी लेखन केले होते. या कार्यक्रमाचे निवेदन दीपाली केळकर यांनी केले होते सहभागी कलाकार - नीलाक्षी पेंढारकर, मृणाल नाटेकर-भिडे, (संगीत-भूषण राम मराठे ह्यांची नात) निमिष कैकाडी हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात देवगंधर्व भास्करबुवा बखले ह्यांनी संगीत दिलेल्या स्वयंवर नाटकाच्या ''धिरवीर पुरुष'' या नांदीने झाली. देवगंधर्व भास्करबुवां पासून रहेमत खाँ-भूगंधर्व, सवाई गंधर्व, बालगंधर्व, छोटे गंधर्व, महाराष्ट्र गंधर्व-सुरेश हळदणकर, कुमार गंधर्व- आनंद गंधर्व, आनंद भाटे अशा सर्व गंधर्वांच्या कलेचा प्रवास उलगडला गेला.

नीलाक्षीताई - मम आत्मा, जोहार मायबाप, येतील कधी गोविंद रे गोपाळा ही पदे छान गायल्या.

मृणालताई - रूपबलि, वद जाऊ, कुमारजींची मधुवंतीमधली चीज, जौनपुरी मधला तराणा, निर्गुणी भजन, अगा वैकुंठीच्या राया ही पदे तयारीने गायल्या. विशेषतः कुमारांच्या चीजा, तराणा, निर्गुणी भजन ह्याचा ढंग त्यांनी उत्तम सांभाळल्या.

निमिष कैकाडी - तोचि विश्वंभर, पद्मनाभा, विमला अधर, श्रीरंगा ही पदे उत्कृष्ट सादर केली. सर्व गंधर्वांच्या गायकीची झलक ऐकवली. कार्यक्रमाचा शेवट आनंद भाटे ह्यांच्या आवाजातील 'चिन्मया सकल हृदया' ही भैरवी ऐकून झाला. तबला- धनंजय पुराणिक व हार्मोनियम- केदार भागवत यांच्या लाजवाब साथीने कार्यक्रम अत्यंत रंगतदार झाला.

दीपाली केळकर ह्यांच्या अभ्यासपूर्ण, खुसखुशीत निवेदनामुळे कार्यक्रम बहारदार झाला.

एका आगळ्या-वेगळ्या या विषयाला कार्यक्रमाला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.

**प्रेषक-कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड**




# कऱ्हाडे ब्राह्मण संघ , मुंबई यांचा श्रावणसंध्या

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई यांचा श्रावणसंध्या हा कार्यक्रम बुधवार, दिनांक २२ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ४ वाजता गिरगावातील साहित्य संघ मंदिर, भालेराव नाट्यगृहात संपन्न झाला. ११८ वर्षे प्रकाशनात कार्यरत असलेल्या केशव भिकाजी ढवळे प्रकाशनाच्या श्रीमती ज्योतीताई ढवळे या प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमास उपस्थित होत्या. समारंभात प्रसिद्ध शास्त्रीय गायिका पंडिता सौ. शुभदाताई पराडकर तसेच श्री. सतीशराव पराडकर यांना संघाच्या



वतीने कऱ्हाडे भूषण सन्मानाने गौरविण्यात आले.

यानिमित्ताने उदय साटम निर्मित 'मराठी पाऊल पडते पुढे' हा महाराष्ट्राच्या संस्कृतीची अस्मिता जपणारा व आधुनिक संगीताशी नाळ जोडणारा बहारदार मराठमोळा कार्यक्रम सादर करण्यात आला. प्रसिद्ध प्रवचनकार सु. ग. शेवडे, गायिका मुग्धा वैशंपायन, संघाचे माजी अध्यक्ष श्री. अविनाश तांबे, श्री. सुहास ढवळे, श्री. भाटवडेकर, ठाणे कऱ्हाडे संघ व बिझिनेस फोरम अध्यक्ष श्री. संजय आंबर्डेकर (उ.), श्री. शेणोलीकर अशा मान्यवरांच्या उपस्थितीने समारंभाची शोभा वाढली होती. विशेष म्हणजे, या संपूर्ण कार्यक्रमाची आखणी व व्यवस्था.

# कशेळी येथील राणी लक्ष्मीबाई जयंतीचा वृत्तांत

रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे स्वातंत्र्यलक्ष्मी झाशीची राणी लक्ष्मीबाई हिची १९० वी जयंती कशेळी, ता. राजापूर येथील सुयोग विकास विद्यामंदिर, जि.प. शाळा नं. ५ मध्ये दि. १८.११. २०१८ रोजी साजरी करण्यात आली.

त्यानिमित्त शाळेतील विद्यार्थिनींच्या क्रीडा, कला विभागातील स्पर्धा घेऊन विजेत्या मुर्लींना रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. सदर कार्यक्रमाचे स्वरुप अतिथी म्हणून श्री. शिवाजीराव माने-निवृत्त गटविकास अधिकारी उपस्थित होते. सरस्वतीपूजन व राणी लक्ष्मीबाईला अभिवादन झाल्यानंतर शाळेतील मुर्लीनी श्रवणीय कनकादित्य स्तुती व स्वागतगीत सादर केले. त्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा शाळेतर्फे व कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे सत्कार करण्यात आला.

त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. माधव हिर्लेकर यांनी संघाचे उद्देश व कार्य विदित केले. शाळेने पार पाडलेल्या स्पर्धांबद्दल मुख्याध्यापक श्री. आशिष सावंत व त्यांचे सहकारी यांचे कौतुक केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. शिवाजीराव माने यांनी राणी लक्ष्मीबाईचे झुंजार चरित्र विशद केले. राणीचा पराक्रम विशद करताना 'एकमेवाद्वितीय, अश्वपारखी व युद्धविशारद' या शब्दांत त्यांनी राणी लक्ष्मीबाईचा गौरव केला. सूर्यनमस्कार सुयोग्यच आराधना आहे, असे त्यांनी नमूद केले. कै. भा. रा. तांबे यांचे, 'हे हिंद बांधता थांब या स्थळी अश्रू दोन ढाळी । ही पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली ।' या गीताचे गायन विद्यार्थिनींनी केले व आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रम संपन्न झाला.





हा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. आशिष सावंत व त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी कनकादित्य मंदिराचे विश्वस्त श्री. अप्पा ओळकर, सरपंच श्री. गुरव, कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. माधव हिर्लेकर, कमिटी मेंबर श्री. सी. यू. हळबे, श्री. दिलीप ढवळे, श्री. मानस देसाई, सौ. प्रतिभा प्रभुदेसाई, सेक्रेटरी सौ. शिल्पा पळसुलेदेसाई, डॉ. प्रभुदेसाई, डॉ. श्रीकृष्ण जोशी, कशेळी ग्रामस्थ व पालक मोठ्या संखेने उपस्थित होते.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ , पुणे

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे शाखेचा कोजागरी कार्यक्रम शनिवार, दि. २७ ऑक्टोबर २००८ रोजी पुण्याई सभागृह, कोथरूड पुणे येथे संपन्न झाला.

कऱ्हाडे ज्ञातीतील कलाकारांना एकत्र घेऊन 'स्वर-सुधा' हा विविध गाण्यांच्या प्रकारांचा कार्यक्रम सादर करण्यात आला; तसेच पुणे संघातर्फे ८०% हून जास्त मार्क मिळविण्याऱ्या १० वी व १२च्या विद्यार्थ्यांना तसेच ७५% हून अधिक गुण मिळविणारे आणि सी.ए. पदवी परीक्षेत सी.एस., इंजिनिअरिंग, वैद्यकीय पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कऱ्हाडे कलावंत गायक सौ. धनश्री घाटे, सौ. अनुराधा करबेळकर, सौ. कविता जांभेकर व श्री. सोमनाथ जायदे यांनी हिंदी-मराठी नव्या-जुन्या गायलेल्या गीतांनी रसिकांची मने जिंकली. त्यांना साथ-संगत केली श्री. राजेद्र तांबे हार्मोनियम, श्री. आदित्य आठवले यांनी तबला व ढोलकीची. याबरोबर स्वर-सुधा कार्यक्रमाच्या गाण्यांना उत्तम निवेदनाची सार्थ होती सौ. मीरा ठकार यांची. त्यांच्या निवेदनाने कार्यक्रमाची लज्जत वाढली.

अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी संघातर्फे दिलेल्या शिष्यवृत्तीबद्दल माहिती दिली. तसेच 'ही शिष्यवृत्ती व आर्थिक मदत करण्यामागे देणगीदारांचे हात आहेत, संघ हा माध्यम आहे. देणगीदारांच्या अमूल्य मदतीखेरीज ही मदत अशक्य आहे' असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. ऋषीकेश पळसुले यांनी केले.

श्री. हेमंत पुराणिक यांनी आभार मानले व यानंतर चतुर्थीनिमित्त पुण्याईचे श्री. गजानन पाध्ये यांनी मोदकांचे सुग्रास भोजनही दिले व कार्यक्रम संपन्न झाला.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेतर्फे रत्नागिरी येथील गरजू विद्यार्थ्यांना नाव रु. ८५००० व वैद्यकीय मदत रु. ५०००० अशी एकूण रु. १३५०००/-ची मदत. पुणे संघ अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी वेळोवेळी केलेल्या आवाहनानुसार रत्नागिरी संघाचे अध्यक्ष श्री. हिर्लेकर यांनी अल्प उत्पन्न गटातील ज्ञातीमधील ३ मुलींना शिक्षणासाठी मदतीची गरज असल्याचे कळविले. श्री. देसाई यांनी त्वरित सर्व मुलींचे मदतीने अर्ज सर्व कमिटीमधील सदस्यांना परिपत्रक स्वरूपात कळविले व ही मदत तातडीने करणे आवश्यक आहे. याची सर्व कमिटीने नोंद घेऊन मोजून १५ दिवसांत रत्नागिरी येथे प्रत्यक्ष जाऊन चेकने मदत केली. पुणे संघाकडून अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई, कार्यवाह हेमंत पुराणिक व खजिनदार श्री. मकरंद फणसळकर हे या प्रसंगी रत्नागिरी येथे उपस्थित होते.

**लक्ष्मीकांत देसाई**

**अध्यक्ष, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे**

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

दि. २०.०९.२०१८ रोजी संस्थेच्या नव्या मिनी सभागृहाचे संस्थेचे अध्यक्ष श्री.सुहास पंडित यांचे हस्ते गणपतीपूजन करून उद्घाटन करण्यात आले. त्या प्रसंगी संस्थेच्या संचालक मंडळातील तसेच व्यवस्थापक मंडळातील काही मंडळी उपस्थित होती.

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाचे स्वत:चे एक मोठे सभागृह, क्षमता साधारणपणे दोनशे व्यक्ती, एक कॉन्फरन्स हॉल-क्षमता साधारणपणे पन्नास ते साठ व्यक्ती व आता नवे मिनी सभागृह क्षमता साधारणपणे साठ ते सत्तर व्यक्ती तसेच एक डायनिंग हॉल, अशी सुसज्ज व्यवस्था आहे. मोठा हॉल व कॉन्फरन्स हॉल वातानुकूलित आहेत. मिनी हॉल वातानुकूलित करण्याच्या विचाराधीन आहोत.



# मा. दीनानाथ मंगेशकर

उदय सप्रे, ठाणे
मो. : ९००४४ ७७२०५

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी निकराची झुंज देत संघर्षमय जीवन जगणारे मास्टर दीनानाथ मंगेशकर यांचा जन्म २९ डिसेंबर १९०० रोजी झाला. गोव्यातील मंगेशी हे त्यांचे मूळ गाव. त्यांच्या वडिलांचे नाव गणेश भट, तर आईचे नाव येसूबाई राणे होय. कै. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची ओळख प्रसिद्ध संगीत नाट्यकलाकार, संगीतकार आणि गायक अशी आहे. संगीत नाटकक्षेत्रातील त्यांचे योगदान अनन्य महत्त्वाचे आहे. त्यांनी अनेक संगीत नाटकांत काम केले.

वयाच्या पाचव्या वर्षी दीनानाथांनी बाबा माशेलकर यांच्याकडून संगीताचे धडे घेण्यास सुरुवात केली. कुशाग्र बुद्धिमत्ता असल्यामुळे संगीत शिकण्यास त्यांना वेळ लागला नाही. त्यांनी ग्वाल्हेर घराण्याची शैली आत्मसात केली. दीनानाथांनी बिकानेरला जाऊन शास्त्रीय संगीताचे शिक्षण पंडित सुखदेव प्रसाद यांच्याकडून घेतले. पंडीत सुखदेव प्रसाद हे पंडीत मणीप्रसाद यांचे वडील. शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतल्यावर दिनानाथ महाराष्ट्रात परतले. त्यांनी सावंतवाडीच्या रामकृष्णबुवा वझे यांच्याकडूनही शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. रामकृष्णबुवा वझे हे ग्वाल्हेर घराण्याचे ख्यातनाम गायक होते. वझेबुवांनी केसरबाई केरकर, व्ही. ए. कागलकरबुवा, तानीबाई, केशवराव भोसले, बापूराव पेंढारकर, भार्गवराम आचरेकर, भालचंद पेंढारकर अशा दिग्गजांना संगीताचे शिक्षण दिले.

वयाच्या १६ व्या वर्षी दीनानाथांनी किर्लोस्कर मंडळीत काम करायला सुरुवात केली. दीनानाथांनी किर्लोस्कर नाटक मंडळी आणि किर्लोस्कर संगीत मंडळी या मंडळातून सुरुवात केली. किर्लोस्कर संगीत मंडळी या संस्थेद्वारे अनेक लोकप्रिय संगीत नाटके त्यांनी केली. काही वर्षे किर्लोस्कर मंडळीसोबत काम केल्यानंतर दीनानाथांनी त्यांचे मित्र चिंतामणराव कोल्हटकर आणि कृष्णराव कोल्हापुरे यांच्या मदतीने बलवंत संगीत मंडळी या नाट्यसंस्थेची स्थापना केली. बलवंत नाट्यसंस्था उभी राहिली आणि



दीनानाथ निर्माते झाले. अनेक लोकप्रिय संगीत नाटकांची निर्मिती त्यांनी केली. दीनानाथांनी एकाच वेळी अनेक भूमिका पार पाडल्या. ते निर्मातेही होते, रचनाकारही होते, कलाकार होते आणि गायकही होते. असे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. दीनानाथांनी रुद्रवीणेच्या वापरास प्रोत्साहन दिले. त्यांच्या आग्रहामुळेच पंडित कृष्णराव कोल्हापुरे रुद्रवीणा उस्ताद मुराद खान यांच्याकडून शिकले. दि. २५ नोव्हेंबर १९२२ ला दीनानाथांनी पणजीत गायनाचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात पोर्तुगीज गव्हर्नर जनरल उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमानंतर दीनानाथांचे कौतुक केले. त्यांना सोन्याची दोन पदके देऊन त्यांचा गौरव केला. याप्रसंगी गव्हर्नर जनरल यांनी दीनानाथांना उद्देशून Filho de Goa (गोव्याचा सुपुत्र) असे गौरवोद्गार काढले.

वयाच्या २१ व्या वर्षी १९२२ मध्ये दीनानाथ थाळनेर येथील नर्मदा लाड यांच्याशी विवाहबद्ध झाले. दीनानाथांनी त्यांचे नाव श्रीमती असे ठेवले. त्यांना लतिका नावाची मुलगी होती, पण तिचा मृत्यू झाला. नजीकच्या काळातच श्रीमती यांचाही मृत्यू झाला. १९२७ मध्ये दीनानाथांनी द्वितीय लग्न अत्यंत साधेपणाने केले. द्वितीय पत्नीचे नाव त्यांनी शुद्धमती असे ठेवले. शुद्धमती ह्या माई म्हणूनदेखील ओळखल्या जायच्या.

१९३५ च्या दरम्यान दीनानाथ मंगेशकर यांच्या बलवंत पिक्चर्स या संस्थेने तीन चित्रपटांची निर्मिती केली. दीनानाथांनी आपल्या नाटकांतून ब्रिटिश सत्तेला कायमच विरोध केला. त्यांनी वीर सावरकर लिखित 'संन्यस्त खड्ग' हे नाटक रंगमंचावर सादर केलं. ब्रिटिश व्हाइसरॉय समोर शिमल्यात त्यांनी सावरकरांच्या नाटकाचा प्रयोग केला. 'रामराज्य वियोग' हे नाटक सोडले तर इतर नाटके पाच अक्षरी होती. दीनानाथांचा अंकशास्त्रावर विश्वास होता. त्यामुळेच त्यांच्या नाटकांची नावे पंचाक्षरी असत असा समज होता. देशकंटक, पुण्यप्रभाव, मानापमान. सावरकरांचे नाटक सादर करून दीनानाथांनी ब्रिटीश सत्तेला उघड विरोधच केला होता. दीनानाथ मंगेशकर यांनी अनेक संगीत नाटके रंगमंचावर सादर केली, किर्लोस्कर आणि त्यांच्या संस्थेने विविध नाटके सादर केली ज्यात दीनानाथांनी काम केलं. यात खाडिलकरांनी लिहिलेले संगीत मानापमान, सावरकरांनी लिहिलेले संन्यस्त खड्ग, गडकरींनी लिहिलेले

राजसंन्यास, वामनराव जोशी यांनी लिहिलेले रणदुंदुभी या नाटकांचा समावेश आहे. याखेरीज पुण्यप्रभाव, देशकंटक आणि रामराज्यवियोग या नाटकांतही दिनानाथ मंगेशकरांनी काम केले.

दीनानाथ मंगेशकर यांनी समाजाच्या विकासासाठी बरेच योगदान दिले. १९२६ मध्ये जांबुवली येथे भरलेल्या पोर्तुगीज शिक्षण प्रसारक मराठा समाज या संस्थेच्या दुसऱ्या वार्षिक सभेस दीनानाथ उपस्थित होते. पणजी येथे मैफिल घेऊन दीनानाथ मंगेशकरांनी वसतिगृह उभारण्यासाठी मराठा समाज शिक्षण फंडाला मदत केली. दीनानाथांनी समाजाला वेळोवेळी मदत केली. दि. १८ डिसेंबर १९३७ रोजी प्रागतिक मराठा समाजाच्या मदतीसाठी दीनानाथ मंगेशकर यांनी कार्यक्रम केला. यात दत्ताराम पर्वतकर, दत्तीबाई नागेशकर, केशरबाई काळे यांनी भाग घेतला.

दीनानाथांनी स्वतःची आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नसतानाही समाजाला मदत केली. त्यांचे हे कार्य आम्ही कधीच विसरू शकत नाही; जर विसरलो, तर ती कृतघ्नता ठरेल. दीनानाथांनी कायम सामाजिक बांधिलकी जपली. वयाच्या ४२ व्या वर्षी १९४२ मध्ये पुण्यात दीनानाथांची प्राणज्योत मावळली.

# चांदण्याचे थवे

**संग्रहक – सौ. शुभदा गुर्जर, पुणे**
**मो. : ८३९०२ ९००४५**

सौ. वैशाली हळबे यांचा विविध विषयावरील कवितांचा 'चांदण्याचे थवे' कार्यक्रमआहे. सौ. वैशाली हळबे यांची स्वप्ने आणि अस्तित्व या कविता बरेच कांही सांगून जातात. त्यांनी आपल्या कवितांमध्ये चारोळ्यांचाही आस्वाद घेतला. सौ. हळबे यांची भाषा सरळ, सोपी तितकीच परिणामकारी आहे. त्यांच्या काही कवितांमधील ओळी विचारांना चालना देणाऱ्या आहेत. अशीच एक कविता–

अस्तित्व

काळोख गर्द वेणा, दिवसा विरून गेल्या
सूर्यास जाग आली, दव पाकळीत ओल्या।
नभ चांदण्यात जेंव्हा उजळून मौन झाले
ते श्वास चंद्रम्याचे, अवघ्या दिशांत भरले !
स्वप्रस्थसागराची, आवर्तमग्न वाळू
पृथ्वीस वाटलेली केसांत आज माळू!
शिवणीत पर्वतांच्या, पाषाण मग्न तुकडे
गर्भस्थ भावनांना, कुरवाळतात झाडे!
पानाफुलांत गंध, हसतो जरा-जरासा
सृष्टीस पावसाचा, मिळतो पुरा दिलासा !
हे विश्व प्रकाशमान, मानव्य दीप तेज
नावीन्य रोज येथे, आयुष्य हो सतेज!
अस्तित्व जाणिवांचे, उमले चराचरात
चैतन्य गीत झरते साऱ्याच जीवनात!

## Sad News

We deeply regret to inform you the sad demise of Shri Indaje Shrirama Bhat aged about 73+ Years on 25th Nov 2018 after a short illness at Mysore. He is survived by Wife, 2 Sons , 1 Daughter and lot of friends and relatives. Shriramanna, who has spent more than 45 years in Karada Brahmana Adhyudaya Sangha ® Agalpady from a common member to be the president of the samaja. He was an officio of the Shankara Sadana Samithi till recently. Sriramanna, who has served at St. Philomina Bettampady Navodaya School, was the headmaster at Sullyapadadu Sarvodaya School when he retired from Service.

Instrumental in the construction of Shankara Sadana, worked with the generation of Krishna Bhat Perla till S.N Kayaragadde, was a great motivator for the younger generation. We at Karada have lost a great social worker.

On behalf of all the Karada members, we deeply condole the sad demise of Shree Shriramanna, while offering our prayers to the Almighty GOD to give enough strength & courage to the members of the bereaved family to face this irrevocable loss of their loved one.

All Karhade Sangh and Mahasangh

# बाळशास्त्री जांभेकर

संदीप कळके, ठाणे
मो. : ९८२२१ ४८६११

बाळशास्त्री जांभेकर – जन्म जानेवारी ६, इ.स. १८१२, पोंभुर्ले, महाराष्ट्र. मृत्यू मे १८, इ.स. १८४६– पेशापत्रकारिता, साहित्यप्रसिद्ध कामे दर्पण मूळ गाव पोंभुर्ले (देवगड तालुका, सिंधुदुर्ग)वडील गंगाधर शास्त्र जांभेकरांनी बालपणी वडिलांकडे घरीच मराठी व संस्कृत भाषांचा अभ्यास आरंभला. इ.स. १८२५ मध्ये त्यांचे मुंबईमध्ये आगमन झाले. मुंबईस येऊन ते सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे आणि बापूशास्त्री शुक्ल यांजकडे अनुक्रमे इंग्रजी व संस्कृत शिकू लागले. या दोन विषयांबरोबरच गणित आणि शास्त्र या विषयांत त्यांनी प्रावीण्य मिळविले. 'बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणाही भारतीयाला तोवर न मिळालेली प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान कमवले. इ.स. १८३४ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजात पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली.

बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या भाषांचे ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल फ्रान्सच्या राजाकडून त्यांचा मानसन्मान झाला होता.

जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांचे शोधनिबंध लिहिले. मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली. त्यांच्यात पांडित्य आणि अध्यापनपटुत्व या गुणांचा मिलाफ होता. गणित व ज्योतिष यातही ते पारंगत असल्यामुळे त्यांची कुलाबा वेधशाळेच्या संचालकपदी नियुक्ती झाली होती. शिवाय त्यांना रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान होते.

मुंबईतल्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकवताना, समाजात वावरताना बाळशास्त्रींना अनेक समस्या अस्वस्थ करीत. पारतंत्र्याने ग्रासलेला देश, याबरोबरच समाजातील अनेक रूढी, चाली-रीती, अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यामुळे एतद्देशीय समाज कसा



व्याधिग्रस्त झाला आहे, या विचाराने ते चिंताग्रस्त असत. त्यांना जाणवले की, केवळ महाविद्यालयात शिकवून उपयोग नाही; तर संपूर्ण समाजालाच धडे दिले पाहिजेत. श्रीपती शेषाद्री नावाच्या एका मुलाला त्यांनी योग्य मार्ग दाखवला; मात्र समाजाचे प्रबोधन करण्यासाठी वृत्तपत्र काढावे, असे लवकरच त्यांना वाटू लागले. या जाणिवेतून आपले सहयोगी गोविंद विठ्ठल कुंटे ऊर्फ भाऊ महाजनांच्या मदतीने त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले.

दि. ६ जानेवारी इ.स. १८३२ रोजी दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला. जनसामान्यांसाठी वृत्तपत्राची भाषा मराठी ठेवण्यात आली असली, तरी ब्रिटिश शासनापर्यंत आपला आवाज जावा या हेतूने वृत्तपत्राचा एक स्तंभ इंग्लिश भाषेत असायचा. वृत्तपत्राची किंमत १ रुपया होती. इंग्रजी आणि मराठी अशा जोड-भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र! या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे. मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि वृत्तपत्रात काय लिहिले आहे, हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी इंग्रजी मजकूर होता. वृत्तपत्राची संकल्पना त्या काळी लोकांना नवी होती. त्यामुळे दर्पणचे वर्गणीदार सुरुवातीच्या काळात खूप कमी होते. पण लोकांमध्ये ही संकल्पना जशी हळूहळू रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. दर्पणवर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. दर्पण अशा रीतीने साडेआठ वर्षे चालले आणि जुलै इ.स. १८४० ला त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.

दर्पण वृत्तपत्रासोबत मराठीतले पहिले मासिक 'दिग्दर्शन' त्यांनी इ.स. १८४० साली सुरू केले. 'दिग्दर्शन'मधून ते भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, व्याकरण, गणित तसेच भूगोल व इतिहासावर लेख प्रकाशित करत. भाऊ दाजी लाड, दादाभाई नौरोजी हे त्यांचे विद्यार्थी त्यांना या कामी मदत करत. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी ५ वर्षे काम पाहिले. या मासिकातून त्यांनी भूगोल, इतिहास, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, निसर्ग-विज्ञान आदी विषयांवचे लेखन नकाशे व आकृत्यांच्या साह्याने प्रसिद्ध केले. या

अभिनव माध्यमातून त्यांनी लोकांची आकलनक्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला. दि. ६ जानेवारी १८३२ रोजी जांभेकर यांनी दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र काढले. दर्पण या वृत्तपत्रात इंग्रजी व मराठी भाषेमध्ये मजकूर असायचा. या वर्तमानपत्राचा उद्देश हा स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धीयेथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रेतेने व उपपद्धतीने विचार करावयास उद्युक्त व्हावे.

सार्वजनिक गंथालयांचे महत्त्व ओळखून 'बाँबे नेटिव्ह जनरल लायब्ररी' या ग्रंथालयाची जांभेकरांनी स्थापना केली. 'एशियाटिक सोसायटी'च्या त्रैमासिकात शोधनिबंध लिहिणारे ते पहिले भारतीय होते. ज्ञानेश्वरीची पहिली मुद्रित आवृत्ती त्यांनी इ.स. १८४५ मध्ये काढली. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात ते हिंदुस्तानी भाषेचे अध्यापन करत. त्यांच्या प्रकाशित साहित्यकृतींमध्ये 'नीतिकथा', 'इंग्लंड देशाची बखर', 'इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप', 'हिंदुस्थानचा इतिहास', 'शून्यलब्धिगणित' या ग्रंथांचा समावेश आहे. 'दर्पण' हे बाळशास्त्रींच्या हातातील लोकशिक्षणाचे एक माध्यम होते. त्यांनी त्याचा प्रबोधनासाठी उत्तम वापर करून घेतला. यात विशेष उल्लेख म्हणजे, त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रश्नाचा व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसाराचा करावा लागेल. बाळशास्त्रींनी या विषयांवर विपुल लिखाण केले. त्यामुळे त्यावर विचारमंथन होऊन त्याचे रूपांतर पुढे विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीत झाले. ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजित ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. देशाची प्रगती, आधुनिक विचार आणि संस्कृतीचा विकास यासाठी वैज्ञानिक ज्ञानाची गरज आहे, तसेच सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या विवेकनिष्ठ भूमिकेसाठी शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराची आवश्यकता आहे, याची जाणीव त्यांना झाली होती. विज्ञाननिष्ठ मानव उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते. थोडक्यात, आजच्यासारखा ज्ञानाधिष्ठित समाज त्यांना दोनशे वर्षांपूर्वीच अपेक्षित होता. त्या अर्थाने ते द्रष्टे समाजसुधारक होते. विविध समस्यांवर सकस चर्चा घडवण्यासाठी बाळशास्त्रींनी 'नेटिव्ह इंप्रूव्हमेंट सोसायटी'ची स्थापना केली. यातूनच पुढे 'स्टुडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटी' या संस्थेला प्रेरणा मिळाली व दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड यांसारखे दिग्गज कार्यरत झाले.

बाळशास्त्रींनी साधारणपणे इ.स. १८३० ते इ.स. १८४६ या काळात आपले योगदान महाराष्ट्राला व भारताला दिले.

त्यांचे विचार प्रगमनशील होते. ख्रिस्त्याच्या घरात राहिल्यामुळे वाळीत टाकल्या गेलेल्या एका हिंदू मुलास त्यांनी तत्कालीन सनातन्यांच्या विरोधास न जुमानता शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेण्याची व्यवस्था केली. अल्पावधीच्या आजारानंतर मुंबईत त्यांचे निधन झाले.

'बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'चे 'नेटिव्ह सेक्रेटरी', अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक, एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये पहिले असिस्टंट प्रोफसर, शाळा तपासनीस, अध्यापनशाळेचे (नॉर्मल स्कूल) संचालक अशा अनेक मानाच्या जागांवर त्यांनी काम केले. त्यांना 'जस्टिस ऑफ द पीस' ही करण्यात आले होते (१८४०).

६ जानेवारी, १८३२ रोजी दर्पण वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला, तसेच योगायोगाने ६ जानेवारी हा जांभेकरांचा जन्मदिवसही असल्यामुळे हा दिवस दर वर्षी महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला होतो.

With best compliments from...



MUKESH V. JOSHI

INSURANCE & INVESTMENT ADVISOR

CONTACT FOR

Life Insurance
Pension Planning
Mediclaim
Fire Insurance
Mutual Fund
Fixed Deposits

ADDRESS

"Shri Neelkamal" Anandpura, Nr. Govt. Press,
Kothi Road, Vadodara-390 001
Ph.: 0265-2412812 Mobile : 098250 25006

# राम-कृष्ण लीला

सौ. वीणा पप्रदीप नाटेकर, मुलुंड
मो. : ९८९२९ ८९०२८

गेल्या २५ जूनला आमच्या ठाण्याच्या घराला (संगीतभूषण पं. राम मराठे यांच्या 'नादब्रह्म' बंगल्याला) ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त आम्ही मराठे भावंडांनी घराचा ५० वा वाढदिवस साजरा करायचे ठरवले.

बंगल्याचं 'नादब्रह्म' हे नाव बाबांनीच ठेवलं. या घरात तंबोरे अखंड चालू राहिले पाहिजेत, असे त्यांनी दोन्ही भावांना (संजू, मुकुंद) सांगितले. खऱ्या अर्थानं तंबोरा गवसणीत कधी गेलाच नाही. ठाण्याच्या घराचं 'नादब्रह्म' हे नाव यथार्थ ठरलं. बाबांची इच्छा पूर्ण झाली.

'नादब्रह्म' सुवर्ण स्वरांनी झळझळतंय असं म्हंटल तर ते खोटं नाही. आज चौथ्या पिढीनेसुद्धा तो वारसा जपलाय, चालू ठेवलाय. गुरूशिष्य परंपरा, गुरुकुलपद्धत हा वारसा-वसासुद्धा पुढे चालू राहिलाय.

घराच्या मुख्य दरवाज्यावर तंबोरे, डग्गा, तबला यांची रचना करण्याची कल्पना आईचीच.

दि. १२ मे ला सकाळी नवग्रहशांत झाली. संध्याकाळी ह.भ.प. अपमार्जने यांचे कीर्तन झाले. आदरणीय अपमार्जने यांना राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून पुरस्कार मिळालेला आहे. आई-बाबा दोघांनाही कीर्तनाची आवड होती. कित्येक वेळा ठाण्याच्या कोपीनेश्वर मंदिरात कोणाच्याही किर्तन-प्रवचन असेल, तेव्हा बाबा आवर्जून कीर्तनाला जात असत. म्हणूनच या सुवर्णमहोत्सवी वाढदिवसानिमित्त कीर्तन आयोजित केलं.

घराची वास्तुशांत झाली. त्या दिवशी रात्री पुण्याचे ह.भ.प. मेहेंदळेबुवा यांचं कीर्तन झालं होतं. कीर्तनाच्या मध्यरंगात किती तरी कीर्तनकारबुवा बाबांना अभंग म्हणायला सांगत.

आमच्या घरातील चौथ्या पिढीचे गायन १३ तारखेला झाले.

या घरांनी, वाडवडिलांनी सांगीतिक वारशाबरोबर आध्यात्मिक संस्कारही आमच्यावर केले. आई-बाबा दोघंही धार्मिक वृत्तीचे होते. आमच्याकडे पूजा-अर्चा, देवतार्चन अखंड चालू असायचं. तोच वारसा, प्रथा अजूनही चालू आहे हं! सामाजिक कार्य करायलाही तत्पर. कोणताही गाजावाजा, वाच्यता न करता. अगदी वैयक्तिक मदतीबरोबर अनेक संस्थांना आई-बाबांनी मदत केली. अनेकांचे संसार उभे केले.



मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर

सुवर्णमहोत्सवी समारंभामुळे घराच्या अनेक आठवणी जाग्या झाल्या. मनाच्या टिपकागदावर टिपलेल्या आठवणी पुन्हा टवटवीत झाल्या. आमच्या घराला अनेक दिग्गजांचे, कलाकारांचे पाय लागले. आमच्याकडे अनेक व्यक्तींचा राबता असे. अनेक व्यक्तींना प्रत्यक्ष पाहिलं नाही, तरी त्यांची व्यक्तिमत्त्व कायम स्मरणात राहिली.

साधरण १९७० च्या मे महिन्यात आमच्या घरी 'संगीत कलानिधी' मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर चार दिवस राहायला आले होते. माझ्या आजीचे (बाबांच्या आईचे) आणि गुणिदास जगन्नाथबुवा पुरोहित या दोघांचे घराला पाय लागले नाहीत. या गोष्टीचं बाबांना दुःख होतं. मास्तर तर बाबांचं दैवत. त्यामुळे मास्तर आमच्या घरी राहायला आले, तेव्हा बाबा खूप खूष होते. नेमके त्याच कालावधीत आम्ही चौघ भावंडं कोकणात गेलो होतो. आई-बाबा मागाहून येणार होते. मास्तर येणार, ही गोष्ट अचानक ठरली. आधी ठरलं असतं, तर आम्ही भावंडं कोकणात गेलो नसतो. त्या कलामहर्षीला जवळून पाहण्याचा योग आमच्या नशिबात नव्हता. ही गोष्ट मात्र कायम मनाला लागून राहिली.

कोकणातून आल्यावर आईशी त्या चार दिवसांतल्या गप्पा-गोष्टी करताना आई भरभरून बोलत होती. बोलताना तिच्या डोळ्यांत, स्वरात मास्तरांबद्दल प्रचंड आदर जाणवत होता. त्या चार दिवसांत मास्तरांना भेटायला रीघ लागली होती. घराला मंदिराचे रूप आले होते. रामाच्या मंदिरात कृष्णाच्या दर्शनासाठी लोकांची रीघ लागली होती.-''एवढ्या सर्वांचा चहा-पाणी करताना तू दमलीस ना?'' असं आईला विचारताच. ती म्हणाली ''छे ! छे! साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी-दसरा'' त्यात मास्तर म्हणजे बाबांचं दैवत. बाबांची मास्तरांवर नितांत श्रद्धा. मला त्यांची सेवा करायला मिळाली, थोडे त्यांच्या आवडीचे पदार्थ करायला मिळाले. आईच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद, समाधान दिसत होते.

ओघाने मास्तरांची आठवण निघताच बाबांकडून ऐकलेल्या मास्तरांच्या आठवणींना उजाळा मिळाला. मला मास्तरांच्या आणि बाबांच्या कलागुणांत, स्वभावात साम्य आढळलं. पाहा हं!

मास्तर आणि बाबा लहान असतानाच दोघांच्याही वडिलांचं निधन झालं.

दोघांच्याही आईचं नाव मथुरा. मास्तरांच्या वडिलभावानी मास्तरांना देवगंधर्व भास्करबुवांच्या पायांवर घातलं. ''पोटाच्या मुलाप्रमाणे सांभाळ करा,'' असं सांगितलं.

बाबांच्या मामाने (रिसबुडमामा) बाबांना मास्तरांकडे नेलं. पुढील गोष्टीच्या खोलात जात नाही. ते सर्वश्रुत आहे.

नट - दोघांनाही बालकलाकार म्हणून प्रसिद्धी मिळाली. मास्तरांना गायक, नट म्हणून तर बाबांना गायक, सिनेनट म्हणून प्रसिद्धी मिळाली. दोघांनाही पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून नाटक-सिनेमात काम करावं लागलं.

नटवर्य गणपतराव बोडसांनी (अतुल परचुरेचे पणजोबा) मास्तरांना स्त्री-भूमिकांसाठी अभिनयाचं शिक्षण दिलं. बाबांचंही रंगभूमीवर पदार्पण झालं ते गणपतराव बोडसांमुळेच. बाबांच्या स्वयंवर, सौभद्र, संशयकल्लोळ यांमधील भूमिका गणपतरावांनीच बसवून घेतल्या.

संशयकल्लोळ नाटकात जलशाच्या प्रवेशात मास्तरांचे गायन होई. तसेच बाबांचंही जलशाच्या प्रवेशात मास्तरांचे गायन होई. दोघांचंही गायन म्हणजे श्रोत्यांना, प्रेक्षकांना पर्वणीच असे.

संगीत दिग्दर्शन - देवगंधर्व भास्करबुवांचा आदर्श ठेवून, तो गाभा शाबूत ठेवून मास्तरांनी संगीत दिलं. संदर्भाला अनुसरून पोषक अशी चाल देण्याचं कसब मास्तरांजवळ होतं. द्रौपदी, मेनका, आशा-निराशा, नंदकुमार, विद्याहरण, एकच प्याला, विधिलिखित, अमृतसिद्धी, कान्होपात्रा, सावित्री, कुलवधू या नाटकांच्या संगीत दिग्दर्शनाचे वैशिष्ट्य मास्तरांचे. हातात हार्मोनियम न घेता बुवांच्या परंपरेत भर घालून मास्तरांनी संगीताचा विकास केला.

चित्रपटयुग सुरू झाल्यावर मास्तरांनी 'कुलवधू'मधील पदांना भावगीतांचा ढंग दिला. मंदारमाला, मेघमल्हार, रंगात रंगला श्रीरंग या नाटकांतील पदांना बाबांनी संगीत दिले. सुवर्णतुला नाटकातील काही पदांना बाबांनी संगीत दिल. डोक्यात चालीचा उगम झाला की मुखवाटे चाल बाहेर पडे. डग्याचा किंवा पायाच्या गुडघ्यावर ठेका धरून स्वतःशीच रचनेचा अभ्यास करत. भास्करबुवा व मास्तर यांचा आदर्श समोर होता. नाटकात काम करणाऱ्या कलाकाराची पद बसवताना स्वतः ठेका धरून बसवून घेत. गायकाला, नटाला पद गायला पूर्ण वाव असे. संगीत देताना दोघांनीही हातात हार्मोनियम घेतली नाही.

मास्तरांनी ज्या गायकांसाठी चाली बांधल्या, त्यामध्ये नटसम्राट बालगंधर्व, जी. एन. लोंढे, विनायकबुवा पटवर्धन, हिराबाई, जोत्स्नाबाई भोळे आदी घराणेदार गायकांचा त्यांच्या शैलीदार गायकीनुसार अभ्यास करून मास्तरांनी



पंडीत राम मराठे

चाली बांधल्या. त्यामुळे त्या चालींवर छाप मास्तरांची असली, तरी त्या गायकांच्या गायकीनुसार रागांचा वापर, स्वरलगाव इत्यादीने अत्यंत खुबीने मास्तर स्वररचना करत. त्यामुळे ती स्वररचना गाताना ते कलाकार मुक्तपणे, सहजतेने स्वतःच्या गायकीनुसार पद रंगवत असत; मग ते चित्रपटगीत, भावगीत, नाट्यगीत काहीही असो.

हाच आदर्श आणि स्वतःच्या संगीताचा अनेक वर्षांचा विचार असल्यामुळे बाबांनी विविध कलाकारांसाठी त्यांच्या गायकीनुसार चाली बांधल्या. त्याचवेळी नाटकातील व्यक्तिरेखेचे वय, नाटकातील त्याचे स्थान इत्यादी लक्षात घेऊन उत्तमोत्तम चाली बांधल्या. उदाहरण द्यायचं झालं. तर मंदारमालामधील छंदी-फंदी राजगायक म्हणून त्यांना शास्त्रीय बंदिशीबरोबरच गझल इत्यादी उडत्या चालीही बांधल्या. सुवर्णतुलामध्ये मास्तर अनंत दामले ह्यांच्यासाठी तसेच मंदारमाला, रंगात रंगला मध्ये अण्णा पेंढारकर यांच्यासाठी खास वझे बुवांच्या पठडीतले राग, बंदिशी यावरठुकुम चपखल चाली बांधल्या. राजगायिका म्हणून मंदारमालामध्ये ज्योत्स्ना मोहिलेंसाठी 'सो हम हर डमरु बाजे' सारख्या भारदस्त रचना तर त्याचवेळी रंगात रंगला श्रीरंगमध्ये किर्ती शिलेदारांसाठी तोडी, असावरी या दोन रागांवर अधारीत 'हरीची ऐकताच मुरली' अशी भावपूर्ण रचना केली. या चाली बांधताना बखलेबुवा आणि मास्तरांनी विविध अनवट राग वापरले होते. बाबांनीही त्यांच्या काळात असलेले अनवट नावीन्यपूर्ण राग बांधले. बैरागी भैरव, हुसेनी कानडा, संगमकेदार, अभोगी, वसंत बहार, जोगकंस असे विविध राग नाट्यपदांसाठी वापरले.

काही पदांना त्या काव्याच्या खंडाचा विचार करून ते पद तालाचा बदल करून चाल बांधली. ते पद कुठल्याही आलाप, ताननं जोडलं नाही. अगदी सहज एका तालातून दुसऱ्या तालात पद जोडलं जातं.

उदा. - 'हे सागरा नीलांबरा' या पदाला एकताल आणि त्रितालचा वापर केला, तर 'सखे बाई सांगते मी' या पदाला दादरा आणि त्रितालचा वापर केला. गायक - मास्तरांना आणि बाबांना दोघांनाही 'मैफलीचा बादशहा' असे संबोधत. कार्यक्रमाला जाताना मास्तर भास्करबुवांचा, आईचा, ज्ञानेश्वर माऊलीचा फोटो काढून त्याला नमस्कार करत.

बाबासुद्धा कार्यक्रमाला जाताना स्नान करून शुचिर्भूत होऊन देवाजवळ बसून

त्यांची ठरावीक स्तोत्रे म्हणत. कपाळाला बुक्का लावत. आमच्या घरात भास्करबुवांचा, मास्तरांचा मोठा फोटो आहे. त्याला नमस्कार करूनच बाबा बाहेर पडत.

दोघांनीही बिदगीसाठी अडवणूक केली नाही. मिळेल त्या बिदागीत मनापासून गात. दोघांचीही मैफलीची वेळ रात्री १० ते ५ असे रसिकाबद्दल प्रचंड आत्मीयता. आयत्या वेळी केलेली फर्माईश दोघंही कधी अव्हेरेत नसत. आबालवृद्धांपासून कोणाकडूनही फर्माईश आली तरी त्यांचा मान ठेवत.

रागाच्या पहिल्या पकडीपासून राग कोणता, ते लोक ओळखत असत. त्यासाठी रागावर हुकमत असणे आवश्यक असते. 'आनंद देणं', आनंद घेणं हीच दोघांची वृत्ती होती.

बंदिशकार – मास्तर आणि बाबा दोघांनीही बंदिशी रचल्या. मास्तरांना देवगंधर्व भास्करबुवांकडून मिळालेला बंदिशींचा खजिना, शिवाय मास्तरांनी स्वतः रचलेल्या बंदिशी यांचा अनमोल संग्रह होता. मास्तरांनी काही नाट्यगीतांना दिलेल्या चाली लोकप्रिय झाल्या. म्हणून त्या पदावरून बंदिशी बांधल्या. उदा. 'नुरले मानस उदास' हे कान्होपात्रा नाटकातील पद. हे पद लोकप्रिय झालं, म्हणून त्याच चालीवर 'मन से मोहन बिराजे' ही चीज मास्तरांनी बांधली. कोण एके काळी नाटकातील 'दे मज देवा जन्म हा' या पदावरून 'प्रितम सैया लागी रे' ही चीज बांधली.

सा सुंदर बदन – मालकंस<br>
रंग रंग मुखपे, मुंदरी मोरी – अडाणा<br>
पिया कर धर देखो – देस<br>
काहे अब तुम – सोहोनी<br>
खेलते है गिरिधारी – भैरवी

अशा अनेक बंदिशी. १ ते ७ भाग रागसंग्रह काढून मास्तरांनी लहान मुलांना म्हणता येतील अशा तऱ्हेच्या रचना केल्या.

मास्तरांनी उतारवयात हिंडोल बहार, शिवकल्याण, पंचम मालकंस, तिलक केदार, परज कलिंगडा, सोहोनी भटियार अशा अनेक रागांत रचना केल्या.

तोच वारसा, तोच आदर्श ठेवून मास्तर आणि जगन्नाथबुवा पुरोहित यांना वंदन करुन बाबांनीही विविध रागांत सुंदर बंदिशी केल्या.

मंदारमाला नाटकातील लोकप्रिय जुगलबंदी 'बसंत की बहर आयी' हा वसंत बहार रागातील बंदिशीचा मुखडा बाबांचाच.

आपल्या गुरूवरील आदर व्यक्त करताना बाबांनी भीमपलासमध्ये एक रचना केली.

स्थायी – तपत जपत गुरु नाम<br>
रटत रटत साधे काम<br>
अंतरा – 'भास्कर' की ये रीतभात<br>
'कृष्ण दास' रंग बरसे<br>
'गुनीदास' आशिष से<br>
सुरगंगा बहलाइये ।

अडणामध्ये 'आए गोरे दरबार'

अहिर भैरव – 'ले जा संदेसवा'

अशा अनेक बंदिशी केल्या अर्थबोध सहज उलगडेल, हाच विचार केला.

दोघेही 'हजरजबाबी' होते.

क्रिकेटप्रेमी – मास्तर आणि बाबा दोघेही क्रिकेटप्रेमी होते. त्यांचे टिव्हीवरचे क्रिकेटचे सामने कधी चुकवत नसत, तर जुन्या जमान्यातील क्रिकेटवीरांच्या आठवणींचा खजिना मास्तरांजवळ होता. गंमत म्हणजे, सी. के. नायडूंनी 'एक षटकार ठोकला की एक ठुमरी' असा दोघांचा सौदा होता.

बाबा दिवसा-रात्री बऱ्याच उशिरापर्यंत रेडिओची स्टेशनं बदलून गाण्याचे कार्यक्रम ऐकत असत, मग नवोदित कलाकार असोत. की मान्यवर गायक असोत. आवर्जुन कार्यक्रम ऐकत. ते गायक-गायिका भेटल्यावर गाणं चांगलं झालं, ऐकलं, असं सांगत.

त्याचप्रमाणे मास्तरसुद्धा रेडिओवरचे कार्यक्रम ऐकत.

गप्पिष्ट, नकलाकार – बाबा सांगत, गाण्याच्या मैफलीप्रमाणे गप्पांची मैफलही मास्तर खोट्या नकला, विनोद, हकिकती सांगून रंगवत. आजूबाजूच्या लोकांची हसून पुरेवाट होई. जुन्या आठवणीत मास्तर रमून जात, त्या वेळी त्यांचे डोळे पाणावत.

बाबा विद्यार्थ्यांना शिकतात, त्या वेळी ओघाने अनेक गायकांच्या गाण्याचा साक्षात्कार घडवत. बाबांच्या डोळ्यांसमोर त्या गुरुजनांचं दृश्य तरळत असे. बाबा जुन्या आठवणी सांगताना रंगून जात जवळच्या नॅपकिनने डोळे कोरडे करत.

नाटक चालू असतानासुद्धा बाबा वेगवेगळ्या कलाकारांच्या चलण्या-बोलण्याची गाण्यासहित नक्कल करत. स्टेजवराच्या सह-कलाकारांची हसून पुरेवाट होई. हे मी स्वतः अनुभवलं आहे.

गिरगाव ब्राह्मण सभा, मुंबई येथे गणेशोत्सवात मास्तरांचा अनेक वर्षे कार्यक्रम होत असे.

मास्तरांच्या नंतर बाबासुद्धा अनेक वर्ष गणेशोत्सवातील कार्यक्रमात गात होते. बाबा गात होते, त्या वेळी गिरगाव ब्राह्मण सभेत दोन कार्यक्रम होत. तिसरा कार्यक्रम दादरला होत असे. अनेक गिरगावकर उपनगरात राहायला गेल्यामुळे दादरचा कार्यक्रम खास त्यांच्यासाठी असे. तिन्ही कार्यक्रमाच्या वेळी सभागृह खच्चून भरलेलं असे. हा श्रोतृवर्ग मास्तरांच्या, बालगंधर्वांच्या गायकीचा प्रेमी होता.

देवगंधर्व भास्करबुवा बखले यांनी स्थापन केलेल्या 'भारत गायन समाज' पुणे या संस्थेचे मास्तर अध्यक्ष होते. मास्तरांच्या नंतर बाबांनी 'भारत गायन समाजाचे' अध्यक्षपद भूषविले होते.

पण काय विचित्र योगायोग पाहा! मास्तरांचं निधन ललिता पंचमीला २० ऑक्टोबर १९७४ ला झालं.


बाबांचंही निधन ४ ऑक्टोबर १९८९ ला झालं. दोघांचीही तिथी एकच, महिना एकच! केवढं हे गुरूशिष्य प्रेम!

अशा या बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्त्वांच्या 'राम-कृष्ण लिला' किती सांगायच्या.

## मूली खाने से होने वाले फायदे

१) रोजाना सुबह खाने में मूली का सेवन करने से डायबिटीज से जल्द छुटकारा मिलता है ।

२) मूली खाने से जुकाम रोग भी नहीं होता है, इसलिये मूली को सलाद के रूप में जरुर खाना चाहिये ।



३) हर रोज मूली के उपर काला नमक डालकर खाने से भूख न लगने की समस्या दूर हो जाती है।

४) मूली खाने से हमें विटामिन 'ए मिलता है जिससे दातों को मजबूती मिलती है।

५) मूली खाने से बाल झड़ने की समस्या दूर हो जाती है।

६) बवासीर रोग में कच्ची मूली या पत्तों की सब्जी बनाकर खाने से फायदा होता है।

७) अगर पेशाब का बनना बंद हो जाये तो मूली का रस पीने से दोबारा बनना आरंभ हो जाता है।

८) हर रोज कच्ची १ मूली सुबह उठते ही खाने से पिलीया रोग में आराम मिलता है।

९) नियमित रूप से मूली खाने से मधुमेह का खतरा भी कम रहता है।

१०) अगर आपको खट्टी ड़कारे आती है तो मूली के एक कप रस में मिश्री मिलकर पिने से फायदा होता है ।

११) नियमित रूप से मूली खाने से मूँह, आंत और किडनी की कैंसर का खतरा कम रहता है।

१२) थकान मिटाने और निंद लाने में मूली सहायक है।

१३) मोटापा दूर करने के लिये मूली के रस में निम्बू और नमक मिलाकर सेवन करे।

१४) पायरिया से परेशान लोग मुली के रस से दिन में २-३ बार कुल्ले करें व रस पिये, फायदा होगा!

१५) सुबह, शाम मूली का रस पिनेसे पुराने कब्ज में भी लाभ होता है।

१६) मूली के रस में समान मात्रा में अनार का रस मिलाकर पिने से हेमोग्लोबिन बढ़ता है।

१७) मूली को धीरे-धीरे चबाकर खाने से दांत चमकते है, और शरीर के दाग-धब्बे भी दूर हो जाते है।

१८) मूली खाने से हमारी आँखों की रोशनी बढ़ती है ।

१९) मूली नियमित खाने से ब्लड प्रेशर कंट्रोल में रहता है।

२०) मूली खान से पेट में गॅस की तकलीफ नहीं होती है।

२१) हाथ पैरों के नाखुनों का रंग सफेद होता है। रस पिना लाभदायक हो।

२२) सुबह सुबह मूली के नरम पत्तों पर सेंधा नमक लगाकर खाने से मूँह की दुर्गंध दूर होती है।

२३) इसके पत्तों में सोडियम होता है, जो शरीर में नमक भी कमी को दूर करता है।

२४) नियमित मूली खाने से पेट के किडे दूर हो जाते है।

२५) मूली का रस स्वास्थ्य के किये बहुत फायदेमंद है।

**श्रीकृष्ण आंबेकर, बडोदा**
९४७९७ ८९४५५

### दूरदृष्टी

शिक्षक - मुलांनो, आता तुमच्या वह्या-पुस्तकांवर नावे घाला पाहू.

विद्यार्थी - कशाला सर?

शिक्षक - कशाला म्हणजे काय?

विद्यार्थी - तसं नाही सर, नावं घातली म्हणजे ती चांगल्या किंमतीला परत विकली जात नाहीत.

**- श्री. केशव फडणीस, पुणे**

### समय की पाबंदी

मडिकल कॉलेजच्या परीक्षेतील एक प्रश्न ''वेळीपूर्वी डिलिव्हरी झाली, तर त्याला काय म्हणतात?''

'एक्स्प्रेस डिलिव्हरी' एका विद्यार्थ्याचे उत्तर.

**- श्री. केशव फडणीस, पुणे**


WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12% of facebook posts are read
29% of tweets are read
31% of emails are opened
98% of text messages are read
CHECKED 150 TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75% of people prefer receiving marketing messages via SMS
15% prefer receiving email ads
10% prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2Factor.in
95-5459-5459

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची या वर्षातील दुसरी सभा डोंबिवली संघाने दि. २३/१२/२०१८ रोजी आयोजित केली होती. या सभेसाठी मुंबई, पुणे, ठाणे डोंबिवली, बडोदा, मुलुंड, नाशिक, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी या संघांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वप्रथम सतीश पंडित यांनी महासंघाचे पदाधिकारी यांना व्यासपीठावर निमंत्रित केले. त्यानंतर सर्वप्रथम रणरागिणी झाशीच्या फोटोस सोलापूर संघाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत माईणकर यांनी पुष्पहार अर्पण केला आणि दीपप्रज्वलन मा. श्री. विजय आंबर्डेकर- अध्यक्ष महासंघ, मा. श्री. संजय आंबर्डेकर- कोषाध्यक्ष महासंघ, श्री. गणेश गुर्जर- सचिव महासंघ, श्री. आनंद पराडकर- अध्यक्ष नागपूर, मा. श्री. नरेंद्र ताटके- अध्यक्ष नाशिक संघ या मान्यवरांनी केल्यावर सभेची सूत्रे मा. श्री. सुहास पंडित यांनी महासंघाचे सचिव यांच्याकडे सुपूर्द केली.

नेहमीच्या प्रथेनुसार ज्ञातीतील ज्ञात-अज्ञात दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून आदरांजली अर्पण करण्यात आली. या सभेस बरेच नूतन प्रतिनीधी उपस्थित असल्याचे त्यांनी आपापला परिचय करून द्यावा, अशी सूचना मा. सचिव मा. श्री. गणेश गुर्जर यांनी केली. उपस्थित सदस्यांनी आपला परिचय करून देताना डोंबिवली संघाचे अध्यक्ष मा. श्री. सुहास पंडित आणि कार्यवाह मा. श्री. संदीप पुराणिक हे पुष्प आणि भेटवस्तू देऊन स्वागत करत होते.

हा परिचयाचा कार्यक्रम झाल्यावर विषय सूचीनुसार सभेचे कामकाज सुरू झाले. श्री. प्रसाद पंडित- मुंबई यांनी मागील रत्नागिरीला झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखवावे, असे मा. श्री. गुर्जर यांनी सांगितले. ते म्हणाले की, या सभेसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे प्रत्येक संघाला पोस्टाने पाठवली असून त्यावर अभ्यास झाला असेलच. यावर मा. अध्यक्ष यांनी पोस्टाने अहवाल/ कागदपत्रे पाठवली असल्याने फक्त जे ठराव झाले, त्यांचे वाचन करावे. त्यानुसार श्री. प्रसाद पंडित यांनी ठराव वाचून दाखवले आणि हे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर झाले. त्यानंतर महासंघाचे कोषाध्यक्ष मा. श्री. संजय आंबर्डेकर यांनी माहे एप्रिल ते सप्टेंबर २०१८ अखेरचा जमाखर्च सभेस सादर केला आणि त्यावर चर्चा झाली व सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

महासंघाचे अंतर्गत तपासणी अधिकारी यांनी हिशोब तपासल्याचा अहवाल सभा-पटलावर ठेवला आणि ठराव मंजूर करण्यात आला. दर वर्षी २५ फेब्रुवारीअखेर पुढील




वर्षाचे अंदाजपत्रक सादर करावे लागते. आता फेब्रुवारीमध्ये सभा नसल्याने या सभेने सप्टेंबर २०१८ अखेरच्या जमाखर्चावर आधारित अंदाजपत्रक सादर करण्यात आले. याबाबत मा. श्री. गणेश गुर्जर यांनी जाहिरातीमधून जमा होणारी रक्कम कमी असल्याने त्याबाबत सर्व संघांनी आपल्या शहरातून किमान २ जाहिराती आणाव्यात तसेच पृष्ठदान हे आपल्या कार्यकारिणीमधून जमावावे, ज्यायोगे जाहिरातीद्वारे येणाऱ्या उत्पन्नांत वाढ होईल. उपस्थित संघानी यांस चांगला प्रतिसाद देत रु. १५ हजारांच्या जाहिराती मिळवून देण्याचे आणि पृष्ठदान रक्कम देण्याचे आश्वासन दिले. भोजनावकाशानंतर झाशीराणी जयंती हा 'कऱ्हाडे गौरवदिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्याबद्दल कायमस्वरूपी ठराव करून त्यास मान्यता देण्यात आली. अन्य विषयांमध्ये महासंघाचे नियम आणि नियमावलीमध्ये बदल, दुरुस्ती करण्याबाबत चर्चा होऊन ३० जूनअखेर हे काम पूर्ण करून त्याचा रिपोर्ट पुढील सर्वसाधारण सभेमध्ये मांडण्याचे ठरले. महासंघाच्या वतीने आणि ज्या शहरात अशा सभा होतात त्या संघाच्या सहकार्याने त्या शहरातील मान्यवरांचा त्यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करून भेटवस्तू देऊन सत्कार केला जातो.

डोंबिवली संघाने एक नवा पायंडा पाडत त्यांच्या संघाच्या कार्यालयातील श्री. शरद कुलकर्णी आणि श्री. मंदार गोसावी या कर्मचाऱ्यांचा प्रदीर्घ सेवेचे कौतुक करून त्यांचा महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संस्थापक आणि डोंबिवली संघाचे माजी अध्यक्ष व संपर्कचे ७ वर्ष संपादक म्हणून कार्य केलेले मा. श्री. प्रभाकर कोनकर यांचा तसेच डोंबिवली संघाचे कार्याध्यक्ष म्हणून निवृत्त झालेले पण सर्व पदांवर कार्य करून तसेच डोंबिवली संघाचे कार्याध्यक्ष म्हणून निवृत्त झालेले पण सध्या कोणतेही पद नसताना कार्य करणारे मा. श्री. श्रीकांत हर्डीकर यांचा सत्कार महासंघाचे अध्यक्ष, कोषाध्यक्ष, विश्वस्तांच्या हस्ते करण्यात आला. सभेमध्ये प्रत्येक संघाने आपापल्या संघातर्फे होणाऱ्या कार्याची माहिती सांगितली.

या सभेची उत्कृष्ट व्यवस्था डोंबिवली संघाने केली. सकाळचा नाश्ता, जेवण आणि दुपारच्या चहा-नाश्त्याची उत्तम व्यवस्था केली होती. सभेचा समारोप करताना महासंघाचे अध्यक्ष मा. श्री. विजय आंबर्डेकर यांनी आपले मौलिक विचार मांडले. सर्व संघांनी केलेल्या कार्याचा गौरव करत सर्वांना धन्यवाद दिले आणि महासंघाच्या सर्व कार्यक्रमास सहकार्याचे आवाहन करून आपले अध्यक्षीय भाषण पूर्ण केले. महासंघाचे सचिव मा. श्री. गणेश गुर्जर यांनी आजच्या सभेसाठी डोंबिवली संघाने व्यवस्था केली तसेच वर नमूद संघांनी आपले प्रतिनिधी पाठवून सभेचे काम यशस्वी केले, त्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. | T: +91-20-6764 8000

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषकः
संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३० फोन : ०२० २४४३ २४४३.

To, The President,
KARADA BRAHMANA,
Bengaluru, 1/1-1, Main Road,
Rameshwar Temple,
Chamraj Pet,
Bengaluru 560018.

